RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लिऐही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451

शुक्रवार ०४ जुलै २०२५ | वर्ष : ५ | अंक : १८७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Friday 04 July 2025 | Year : 5 | Issue : 187 | Daily | Rate: Rs. 5/-

# मतदार पडताळणी मोहिमेमुळे भाजपाच्या मित्रपक्षांचे वाढले टेन्शन



**नवी दिल्ली :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदार याद्यांची सविस्तर उजळणी व त्यांच्या पुनरावलोकनाची मोहीम हाती घेतली आहे. त्या अंतर्गत राज्यातील सात कोटी 89 लाख मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. एकीकडे भाजपाकडून या मोहिमेचे स्वागत केले जाते, तर दुसरीकडे सत्ताधारी आघाडीतील काही नेत्यांनी या प्रक्रियेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. बिहारमध्ये सध्या भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असून नितीश कुमार हे मुख्यमंत्री आहेत. भाजपाचे राज्यातील दोन प्रमुख मित्रपक्ष- जनता दल युनायटेड व लोक जनशक्ती पार्टीच्या (राम विलास) नेत्यांनी सांगितले की, निवडणूक आयोग दिलेल्या वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करू शकेल का, याबाबत आमच्या मनात शंका आहे. कारण या मोहिमेची सुरुवात 25 जूनला करण्यात आली होती आणि 25 जुलैपर्यंत ती पूर्ण केली जाणार आहे. राज्यातील साक्षरतेची कमी, आर्थिक दुर्बल स्थिती आणि प्रशासकीय उपाययोजनांच्या अभावामुळे वंचित व गरीब समुदायातील नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागू शकतो. नोंदणी महासंचालनालयाच्या (RGI) आकडेवारीनुसार, बिहारमध्ये 2000 मध्ये एक लाख 19 हजार जन्मांची नोंद झाली होती. त्यानंतर राज्यातील जन्म नोंदणी दरात सातत्याने वाढ दिसून आली. 2007 साली बिहारमध्ये सात लाख 13 हजार जन्मांची नोंद झाली होती. 2001 च्या जनगणनेनुसार, 1 मार्च 2001 रोजी राज्यातील एकूण लोकसंख्या आठ कोटी 30 लाख होती, जी 2011 मध्ये वाढून 10 कोटी 40 लाखांवर पोहोचली.

### मतदानासाठी कोण असेल पात्र ?

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, बिहारमधील प्रत्येक मतदाराला व्यक्तिगत गणना फॉर्म सादर करावा लागेल. 1987 नंतर जन्मलेल्या आणि 1 जानेवारी 2003 नंतर यादीत समाविष्ट झालेल्या व्यक्तींना अतिरिक्त कागदपत्रे सादर करावी लागतील. या कागदपत्रांमध्ये जन्म प्रमाणपत्र, पासपोर्ट, जातीचे प्रमाणपत्र किंवा शालेय प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाने जुलै 1987 आधी जन्मलेल्या सर्व मतदारांना जन्म तारखेचा पुरावा सादर करण्यास सांगितलं आहे. 1987 आणि 2007 दरम्यान जन्मलेल्या व मतदानासाठी पात्र असलेल्या व्यक्तींना हा पुरावा सादर करावा लागणार आहे.

### भाजपाच्या मित्रपक्षांचे टेन्शन का वाढले ?

जनता दल युनायटेडच्या एका नेत्याने सांगितले, निवडणूक आयोगाची ही मोहीम गरिबांसाठी अडचणीची ठरू शकते. काही नागरिकांकडे सरकारच्या योजनांशी संबंधित कागदपत्रे असू शकतात; पण आजही राज्यातील बहुतांश लोकांकडे जन्म प्रमाणपत्र नाही, त्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क गमावावा लागू शकतो. मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय समुदायातील नागरिक मतदानापासून वंचित राहिले तर त्याचा मोठा फटका राजकीय पक्षांना बसण्याची शक्यता आहे.

# कांदा खरेदीत 5 हजार कोटींचा भ्रष्टाचार

**नाशिक :** कांदा खरेदीमध्ये 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' च्या व्यवहारात 5 हजार कोटींचा भ्रष्टाचार करणाऱ्या दोषींवर गुन्हे दाखल करावेत आणि सद्यस्थितीत 'नाफेड' खरेदीबाबतचे व्यवहार पारदर्शीपणे जाहीर करावे, या मागणीसाठी शेतकरी संघटनांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले.

स्वतंत्र भारत पक्ष व शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांचे म्हणणे प्रशासनाच्या कानावर घातले. 'नाफेड' व 'एनसीसीएफ' यांच्या भ्रष्टाचारप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारकडून किंमत स्थिरीकरण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानातून कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे आरोपपत्र याचिकाकर्त्यांनी न्यायालयात सादर केले आहे. 'एफपीसी', 'नाफेड', 'एनसीसीएफ' आणि कांदा व्यापाऱ्यांच्या संगनमताने शेतकऱ्यांचे अधिकार आणि पैशांवर घाला घातल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. या घोटाळ्यांमुळे महाराष्ट्रातील व देशातील हजारो कांदा उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. अनेकांनी निराश होऊन आत्महत्या केल्या आहेत. केवळ हा घोटाळा आर्थिकच नव्हे, तर संवैधानिक हक्क आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन करणारा आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या कांदा खरेदीची चौकशी करावी. 'नाफेड' सह अन्य संस्थांनी कांदा खरेदी करताना तो बाजार समित्यांनमध्येच किमान 3 हजार रुपये क्विंटलने खरेदी करावा. हा कांदा देशांअंतर्गत विकू नये. तो परदेशात विकावा किंवा अन्य मार्गे नष्ट करावा, तरच कांदा उत्पादकांना चांगले दिवस येतील. बाजार समितीमध्ये 1 हजार रुपये क्विंटल दराने कांदाविक्री झाल्यास 3 हजार रुपये क्विंटलचा दर पकडून 2 हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे, असे यावेळी सांगण्यात आले.

### 'नुकसानभरपाई द्यावी'

पावसामुळे सर्व पिके खराब झाली आहेत. त्या तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना एकरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी स्वतंत्र भारत पक्ष व शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, सुनील बिरारी, संदीप सोनवणे, प्रवीण आहेर, माणिक निकम, बाळासाहेब शेवाळे आदींनी केली




## तीन महिन्यात 737 शेतकरी आत्महत्या

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावरून विरोधकांनी बुधवारी विधानसभेत आक्रमक पवित्रा घेतला. गेल्या तीन महिन्यांत जवळपास 737 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, या मुद्यावर सभागृहात चर्चेची मागणी विरोधकांनी केली. ती मान्य न झाल्याने विरोधकांनी अखेर सभात्याग केला. राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या प्रश्नावर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडण्याचा करण्याचा प्रयत्न केला. `राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहेत. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत 767 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यातील 200 प्रकरणे अपात्र ठरली असून, 194 प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदतही सरकार देत नाही, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अपमान करतात. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत, कापसाला भाव मिळालेला नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव देऊ असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू, अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको, अशी भूमिका विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली. शिवसेना (उबाठा) आमदार भास्कर जाधव यांनीही शेतकरी आत्महत्यांबाबत सरकारने चर्चा घडवून आणण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा गंभीर विषय आहे. विरोधी पक्षांनी मला याबाबतचा रितसर प्रस्ताव द्यावा. मी या प्रश्नावर संपूर्ण दिवस चर्चेसाठी वेळ देण्यास तयार आहे, असे विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

## डॉक्टर महिलेच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करा : उपसभापती नीलम गोऱ्हे

**मुंबई :** सांगलीच्या इस्लामपूरजवळील विठ्ठलवाडी (ता. वाळवा, जि. सांगली) येथे डॉक्टर शुभांगी वानखडे (वय 44, रा. मुंबई) यांच्या आत्महत्येप्रकरणी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली. या प्रकरणाबाबत डॉ. गोऱ्हे यांनी सांगली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे प्रकरणाची तातडीने व सखोल चौकशी व्हावी, असे निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. डॉ. शुभांगी वानखडे यांचा मृतदेह 2 जुलै 2025 रोजी पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्याच कारमध्ये संशयास्पदरित्या सापडला. त्यांच्या हातावर आणि गळ्यावर नसा कापल्याच्या गंभीर जखमा आढळल्या. ही आत्महत्या आहे की यामागे अन्य कोणती पार्श्वभूमी आहे, हे शोधणे अत्यावश्यक आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी मत मांडले. उपसभापती गोऱ्हे यांनी मागणी केली की, या प्रकरणाचा तपास भारतीय न्याय संहितेच्या व अन्य अनुषंगिक तरतुदी अंतर्गत तातडीने सुरू करण्यात यावा. याशिवाय, आत्महत्येस प्रवृत्त करणे किंवा धमकी देणे यासारखे कोणतेही संकेत मिळाल्यास त्यांचाही तपास करण्यात यावा.



## 21 जुलैपासून संसद अधिवेशन

## अणुऊर्जा विधेयक, विरोधकांच्या मागण्या चर्चेच्या केंद्रस्थानी



**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन 21 जुलै रोजी सुरू होईल आणि 21 ऑगस्ट रोजी संपेल. हे अधिवेशन पूर्वीच्या नियोजित वेळेपेक्षा एक आठवडा जास्त चालेल. त्यामुळे या काळात बरेच काम होईल असे मानले जाते. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले आहे की, 21 जुलै ते 21 ऑगस्ट दरम्यान अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मान्यता दिली आहे. किरेन रिजिजू यांनी 'एक्स' वरील एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर 13 आणि 14 ऑगस्ट रोजी कोणतीही बैठक होणार नाही. यापूर्वी हे अधिवेशन 12 ऑगस्ट रोजी संपणार होते, परंतु आता ते एका आठवड्यासाठी वाढविण्यात आले आहे.

## थापड चुकवली पण बदनामी थांबवू शकलो नाही : अधिकारी




**कर्नाटक :** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी एप्रिल महिन्यात एका मोर्चात बंदोबस्ताला असलेल्या पोलीस अधीक्षकावर हात उगारला होता. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर विरोधकांनी टीका केली. मात्र याचा धसका संबंधित पोलीस अधिकाऱ्यानेच अधिक घेतला. अतिरीक्त पोलीस अधिक्षक एनव्ही बारमणी यांनी या घटनेनंतर जूनमध्ये स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज केला. त्यांच्या अर्जावर अद्याप कर्नाटक सरकारने निर्णय घेतलेला नाही. बारमणी यांनी 14 जून रोजी गृह सचिवांना पत्र लिहून 28 एप्रिलच्या घटनेबद्दल अतीव दुःख व्यक्त केले. काँग्रेसतर्फे महागाईच्या विरोधात मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात भाजपाच्या महिला कार्यकर्त्या थेट स्टेजवर आल्या. भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी कार्यक्रमस्थळी निदर्शने केल्याने संतापलेल्या मुख्यमंत्र्यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक बारमणी यांच्यावर भरसभेतच हात उगारला. बारमणी यांनी गृह सचिवांना लिहिलेल्या पत्रात या घटनेचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाल्याचे म्हटले. त्यांनी लिहिले की, सिद्धरामय्या सर्वांसमोर माझ्या अंगावर धावून आले. इथला एसपी कोण आहे? असे म्हणून त्यांनी माझ्यावर हात उगारला. मी तात्काळ मागे हटलो त्यामुळे त्यांची थापड चुकविण्यात यशस्वी झालो. मी थापड जरी चुकवली असली तरी माझी बदनामी मात्र थांबवू शकलो नाही. बारमणी म्हणाले की, या घटनेचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाला. दोन दिवस सर्व वाहिन्यांवर हाच व्हिडीओ दाखवला गेला. मोर्चातही हजारो लोकांनी हा प्रसंग पाहिला. या घटनेनंतर मी शांतपणे स्टेजवरून खाली उतरलो. कारण मला पोलीस दलाची प्रतिष्ठा आणि मुख्यमंत्री कार्यालयाचा आदर ठेवायचा होता.




अविष्कार संगीत अकादमीची सदस्य स्नेहल टेंबरे हिच्या वाढदिवसानिमित्त तिचे वडील अरूण नारायणराव टेंभरे आणि आई छाया अरूण टेभरे यांनी दैनिक बहुजन सौरभला सहकार्याचा हात दिला, धनादेश स्वीकारताना मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे

PROPERTY FOR SALE
Prime Land with Construction for Sale
Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur Gramin.
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 Hectares (50,000 Sq. Ft) with Construction Around 35000 Sq. Ft.,
Ideal for Schools, Colleges, Training Centers, Residential Tution College, Hotel, Hostel, Amusement Park.
Contact : Sulay 9860361121

चलो संविधान चौक, नागपूर.
1 जुलै 2025 दोपहर 3.00 बजे से
महाबोधी महाविहार मुक्त हो व
दिक्षाभुमी सौंदर्यकरन विनाविलंब सुरु करो
उपरोक्त मांग की ओर बिहार व महाराष्ट्र सरकार का ध्यान केंद्रित करणे हेतु
धरणे आंदोलन
स्थान : संविधान चौक, नागपुर
दिनांक 1 जुलाई से 30 जुलाई 2025 तक समय : प्रतिदिन सुबह 10 बजे से शाम 6 बजे तक
आयोजक संस्थाएं
1. भारतीय बौद्ध महासभा, 2. समता सैनिक दल, 3. भिक्खु एवं भिक्खुनी संघ,
4. महीला सशक्तीकरण संघ, 5. आल इंडिया बुध्दीष्ट फोरम, 6. नागपुर स्थित सभी बौद्ध विहार समीती, सामाजिक व राजकीय, सांस्कृतिक संघटनां
मुख्य सल्लागार : भन्ते डॉ. चंद्रकिर्ती, आयु. शंकरराव ढेंगरे, आयु. इंजी. पदमाकर गनवीर, आयु. प्रकाश दार्शनिक, आयु. गणवीर वानखेडे,
मुख्य व्यवस्थापक : आयु. जे.आर. गोडबोले, आयु. विजय मेश्राम, आयुनी. सरोज राजवर्धन, आयुनी. विना नगराळे, आयु. विनय ढोके, आयु. लक्ष्मीकांत मेश्राम, आयु. गंगाधर कांबळे, आयुनी. उषाताई बौद्ध, आयु. निर्भय बागडे, 9561540611, 7447553209, 7887554537, 9881114388, 9421715584

प्रथम पुण्यस्मरण



स्मृतिशेष विणा भिम शंभरकर (मोटे)
जन्म : 22 नोव्हेंबर 1958 मृत्यू: 4 जुलै 20024
भावपूर्ण श्रद्धांजली
वाटलं नव्हतं कोणाला असे अघटित घडून येईल,
चालता बोलता निसर्ग तुला असे दूर नेईल,
माणुसकी, स्नेह, माया, ममतेची ज्या ज्या वेळा चर्चा होईल,
त्या त्या वेळी सर्वात पहिली आठवण तुझीच होईल.
शोकाकुल : नयन गहूवार (शंभरकर) आणि अयाना गहूवार निकिता शंभरकर

“ नशिबामध्ये नाही तर आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा... ”

बहुजन सौरभ **संपादकीय**

## भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद

‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ हे शब्द भारतीय संविधानाच्या तत्त्वांना अधिक सुसंगत बनवतात. ही फक्त राजकीय घोषणाबाजी नाही, तर भारताच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक वास्तवाशी जोडलेली मूल्यव्यवस्था आहे. आजच्या काळात या मूल्यांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे होणे गरजेचे आहे, कारण हे मूल्यच भारतीय लोकशाहीचे खरे रक्षण करतात. भारतीय संविधानात ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ हे शब्द मूळ 1950 च्या संविधानात नव्हते. हे शब्द 1976 मध्ये 42 व्या संविधान दुरुस्तीने (Constitution ywnd Amendment Act, 1976) प्रस्तावनेत (Preamble) घालण्यात आले. या दुरुस्तीमागचा ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमी समजून घेणे महत्त्वाचे आहे. मूळ प्रस्तावना (1950) भारताच्या मूळ प्रस्तावनेत खालील शब्द होतेः "We, the people of India, having solemnly resolved to constitute India into a Sovereign Democratic Republic..." 42 वी घटना दुरुस्ती (1976) इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने 1976 मध्ये आणीबाणीच्या काळात (Emergency) ही 42 वी दुरुस्ती केली. यामध्ये प्रस्तावनेत तीन महत्त्वाचे शब्द जोडले गेले : "Sovereign, Socialist, Secular, Democratic Republic" का आणि कसे आले हे शब्द?

**‘समाजवादी’ (Socialist) :** ‘समाजवादी’ हा शब्द समाजातील संपत्तीचे वितरण समानतेने होणे, गरीब-श्रीमंतातील दरी कमी करणे, कल्याणकारी राज्य (Welfare State) या तत्त्वांना अधोरेखित करतो. काँग्रेस पक्ष आणि इंदिरा गांधी यांची नीती त्या काळात समाजवादी धारणांशी सुसंगत होती (उदा. बँकांचे राष्ट्रीयीकरण, भूसुधारणा). ‘गरीबी हटाओ’ हा इंदिरा गांधींचा नारा त्या विचारांशी जोडलेला होता. त्यामुळे संविधानाच्या प्रस्तावनेत ‘समाजवादी’ हा शब्द अधिकृतपणे जोडण्यात आला.

**‘धर्मनिरपेक्ष’ (Secular) :** भारत हे विविध धर्मांचे राष्ट्र आहे. संविधानात आधीपासूनच धर्मस्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार (अनुच्छेद 25-28) दिला आहे.

**धर्मनिरपेक्षतेचा अर्थ :** राज्य हे कोणत्याही धर्माशी बांधील नसून सर्व धर्मांशी समान वागणूक ठेवते. परंतु प्रस्तावनेत हा शब्द स्पष्टपणे नव्हता. 1970 च्या दशकात धार्मिक तणाव व काही संघटनांच्या धर्माधिष्ठित राजकारणाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने धर्मनिरपेक्षता हा तत्वतः आणि स्पष्टपणे घटनेत दर्शवावा असा निर्णय घेतला.

**आणीबाणीचा संदर्भ (Emergency Context) :** 1975 ते 1977 दरम्यान भारतात आणीबाणी लागू होती, आणि इंदिरा गांधी यांना संसदेवर पूर्ण नियंत्रण होते. याच काळात 42 वी दुरुस्ती झाली. त्यामुळे या दुरुस्तीवर अनेकांनी लोकशाही मूल्यांवर गदा आणणारी व सरकारचा अधिकारविस्तार करणारी म्हणून टीका केली. तरीही, या दोन शब्दांनी भारतीय संविधानाच्या तत्त्वांना स्पष्ट आणि दृढ रूप दिले, असाही एक दृष्टिकोन आहे. धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद ही मूल्ये संविधानाच्या अनेक तरतुदींमध्ये आधीपासून होती, परंतु 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीने ते प्रस्तावनेत स्पष्ट शब्दांत समाविष्ट करण्यात आले. या निर्णयामागे तत्कालीन राजकीय वातावरण, इंदिरा गांधींचे नेतृत्व, आणीबाणीची पार्श्वभूमी, आणि समाजातील बदलती गरज या साऱ्या घटकांचा परिणाम होता. भारतीय संविधान हे एक महान दस्तऐवज आहे, ज्यामध्ये भारतीय लोकशाहीचे मूलतत्त्व, मूल्ये आणि ध्येय स्पष्टपणे मांडले आहेत. हे संविधान देशातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुता प्रदान करते. या संविधानाच्या प्रस्तावनेत 1976 साली दोन महत्त्वाचे शब्द जोडले गेले - ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’. या दोन संकल्पनांनी भारतीय राष्ट्राच्या मूलभूत विचारसरणीला अधिक सुस्पष्ट आणि बळकट केले.

**धर्मनिरपेक्षतेचा अर्थ व महत्व :** धर्मनिरपेक्षता (Secularism) म्हणजे राज्य कोणत्याही धर्माशी पक्षपाती न राहता सर्व धर्मांना समान मानते. भारतात विविध धर्म, जाती आणि पंथ आहेत. त्यामुळे धर्मनिरपेक्षता ही संकल्पना अत्यंत आवश्यक होती. संविधानात आधीपासूनच अनुच्छेद 25 ते 28 या कलमांद्वारे नागरिकांना धर्मस्वातंर्त्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. 1976 साली 42 व्या संविधान दुरुस्तीने "Secular" हा शब्द संविधानाच्या प्रस्तावनेत समाविष्ट करण्यात आला. यामुळे भारतीय राज्यघटनेच्या मूलभावनेत धर्मनिरपेक्षतेला अधिक स्पष्ट व कायदेशीर मान्यता मिळाली. धर्मनिरपेक्षतेमुळेच भारतात सर्व धर्मांना संरक्षण आहे आणि कोणत्याही एका धर्माचे वर्चस्व नाकारले जाते.

**समाजवादाचा अर्थ व महत्व :** समाजवाद (Socialism) म्हणजे समाजात आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करून सर्व नागरिकांना समान संधी, न्याय आणि मूलभूत गरजांची पूर्तता देणारी व्यवस्था. भारतात स्वातंत्र्यानंतर गरिबी, बेरोजगारी, सामाजिक विषमता ही मोठी आव्हाने होती. त्यामुळे भारतीय राज्यव्यवस्थेने कल्याणकारी राज्य हे आपले ध्येय मानले. 1976 मधील 42 व्या दुरुस्तीने "Socialist" हा शब्द प्रस्तावनेत घालण्यात आला. यामागील उद्देश होता, राज्याची जबाबदारी ठरवणे की ती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवेल. बँकांचे राष्ट्रीयीकरण, भूमिहीनांना जमीन वाटप, गरीबांसाठी कल्याणकारी योजना यांसारख्या निर्णयांना समाजवादी तत्वांचा आधार होता.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :** 1975 ते 1977 या काळात भारतात आणीबाणी लागू होती. या काळात इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली 42 वी घटनादुरुस्ती पारित करण्यात आली. काँग्रेस पक्षाची नीती त्या वेळी समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेशी सुसंगत होती. देशातील काही भागांत धार्मिक तणाव वाढत होते आणि सामाजिक विषमता तीव्र होती. या पार्श्वभूमीवर संविधानातील प्रस्तावनेत हे शब्द समाविष्ट करून संविधानाचे उद्दिष्ट अधिक स्पष्ट करण्यात आले. ■ ■

# भाषेची कोंडी झाली तर संस्कृतीला धोका...!

**महाराष्ट्रीयन माणसांची मातृभाषा मराठी. त्या राज्यात हिंदी भाषेची अनिवार्यता लादण्याचा प्रयत्न झाला. हा फटाका जोरात फुटला. अन् सरकार मागे हटले. पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर हा प्रकार घडला. भाषा संपते. तेव्हा तिच्या सोबत संस्कृती संपते. हा इतिहास आहे. राज्यात 8 कोटी 30 लाख मराठी भाषिक आहेत. ही टक्केवारी 70.34 टक्के आहे. मात्र मुंबईत भाषिक चित्र बदलले. ती बहुभाषिक झाली. यातील बहुतेक चाकरी व नोकरी निमित्त आलेत. त्यात बिहारी, उत्तरप्रदेशी आहेत. वैदर्भिय आहेत. मराठवाडी आहेत. कोकणी, पुणेकर, जळगावी, धुळेकर, पालघरी देखील आहेत. मुंबई काळा सोबत बदलली. कापड मील बंद पडली. मॅचेस्टर ओळखही संपली. तरी मुंबई फुगत राहिली. आकाशासोबत स्पर्धा करणाऱ्या टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. भूखंडांना सोन्यापेक्षा जादा भाव आला. परिणामी मराठी माणूस बाहेर फेकला गेला.**

या मुंबईत मराठी माणूस 42 टक्केच उरला. 23 टक्के हिंदी भाषिक झाले. 13.5 टक्के उर्दू भाषिक आहेत. 11.5 टक्के गुजराती भाषिक झालेत. बाकी तामीळ, कन्नड, बंगाली आदी आहेत. 1971 मध्ये मराठी भाषिकांची संख्या 76.5 टक्के होती. 2011 मध्ये ती 68 टक्यांपर्यत घसरली. मागील 14 वर्षात ती पन्नास टक्याच्या खाली घसरली. नेमकी किती घसरली. हा वादाचा मुद्दा असू शकतो. 2026 च्या जनगणनेनंतर त्यावर प्रकाश पडेल. हिंदी भाषिक वाढल्याची चाहुल शिवसेनेला अगोदरच लागली. त्यामुळे सेनेने चंद्रिका केनिया यांना मंत्री बनविले. संजय निरूपम, मनोज जैन असे हिंदी भाषिक चेहरे आणले. काँग्रेसमध्ये देखील देवरा पिता-पुत्र, कृपाशंकर सिंग सारखे चेहरे होते. ठाणे, रायगड भागातही हिंदी भाषिकांची संख्या झपाट्याने वाढली. नेमक्या शब्दात सांगावयाचे झाल्यास मुंबईची अवस्था ओबीसीं सारखी झाली. महाराष्ट्रात बहुसंख्ये ओबीसी आहेत. मात्र सत्ता मुठभरांचे हाती आहे. तिचे दरबारी किंवा खांदेधारी कोण यास अर्थ नसते. मोगल काळातही दरबारी दुसरे होते. टाटा, बिर्लाच्या हातून आर्थिक सत्ता निसटली. आता अडाणी, अंबानींचे प्रस्त वाढले. त्या रसदच्या जोरावर सत्ताधाऱ्यांचे फुंत्कार वाढलेत. त्यातून भाषा व संस्कृतीची चिंता वाढली.




भाषा चक्राचा इतिहास जुना आहे. देशात हिंदी बोलणाऱ्यांची संख्या सुमारे 53 कोटीच्या घरात आहे. लोकसंख्येच्या तुलनेत ही टक्केवारी 43.63 टक्के आहे. त्यात हिंदीला मातृभाषा मानणारे आणि दुसऱ्या भाषेच्या रूपात बोलणाऱ्यांचा समावेश आहे. उर्दूसह हिंदी समजणाऱ्यांची संख्या 57.1 टक्के आहे. हिंदीला विरोध करणाऱ्यांत तामीळनाडू, केरळ, आंध्र, तेलंगना, कर्नाटक त्यांचा स्थानिक भाषा व इंग्रजीला प्राधान्य आहे. पुर्वोत्तर आसाम, मणिपूर, मेघालय हे राज्य आहेत. त्यांनी कमीअधिक इंग्रजी अंगिकारली. महाराष्ट्रात हिंदी विरोध कधीच नव्हता. हिंदी चित्रपट सृष्टी मुंबईत आहे. त्या बॉलिवूडला मराठी माणसांनी मोठी केले. तिला जगात दुसऱ्या क्रमांकावर नेले. मराठी, हिंदी बहिणींबहिणी सारख्या वागत आल्या. हे सरकारकृत भांडण मराठी भाषा व संस्कृतीवर आघात मानले जाते. गावखेड्यांत देखील कॉन्व्हेंट संस्कृती आली. श्रीमंत, मध्यमवर्गीय त्या आहारी गेलेत. मराठीचा जयघोष करणाऱ्या राजकीय वारकऱ्यांची मुलें झाडून इंग्रजीत शिकतात. त्यांना धड मराठी वाचता येत नाही. मराठी शाळा ओस पडल्या. अन् इंग्रजी शाळेत प्रवेशांची झुंबड वाढली. बरे झाले, काँग्रेसने शिक्षण हक्क कायदा केला. त्याद्वारे गरीबांच्या हुशार मुलांना महागड्या इंग्रजी शाळेत शिक्षणाची संधी मिळते. चपराशी, ऑटोवाला, घरगडी, सफाईवाल्यांची मुलें इंग्रजी शाळेत शिकत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणात मातृभाषेला प्राधान्य दिले. त्यांचा दृष्टीकोण मातृभाषा आणि इंग्रजी भाषेत समन्वय साधणारा होता. राष्ट्रभाषा हिंदी देशाची संवाद भाषा व्हावी. मात्र कोणत्याही भाषेच्या सक्तीला विरोध होता.

राज्यातील त्रिभाषा वाद वाढला. त्यामागे मुंबई मनपा जिंकण्याची स्पर्धा दिसते. हिंदी भाषिक निवडणूक प्रभावित करू शकतात. ही राजकारण्यांची धारणा आहे. याच हेतूने हिंदीचा मुद्दा भाजपने उरकून काढला असावा असा संशय आहे. त्याला भाजपच्या कृतीने बळ मिळते. बिहार, उत्तर प्रदेशातून आलेले मुंबईत स्थायिक झाले. ते विविध पक्षांत सक्रिय आहेत. त्यापैकी अनेकांना भाजपमध्ये आणण्यात आले. अलिकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे नेते राज ठाकरे यांची भेट होते. त्याच आठवड्यात सरकार हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीचा विषय लागू करण्याचा जी.आर. काढते. कदाचित हा योगायोग असेल. मात्र राजकारण गॉसिपवर चालते. दुसरी एक बाजू राज ठाकरेंची मनसे उबाटाच्या माध्यमातून महाविकास आघाडीसोबत आल्यास बिहारमध्ये काँग्रेसला फटाके लावण्याचा मार्ग प्रशस्त होतो. मुंबईत काँग्रेस, भाजप, उबाटा या पक्षांचा प्रभाव आहे. काँग्रेस-उबाटा एकत्र लढली. तर भाजपचे गणित बिगडू शकते. मनसे महाविकास आघाडीसोबत गेली तर भाजपची सत्तेची संधी हुकते. भाजप निवडणुकीचा अजेंडा ठरवू इच्छिते. त्यावर विरोधी पक्षांनी खेळावे म्हणजे लोकांचे जगण्याचे प्रश्न मागे पडतात. विरोधी पक्ष हिंदी सक्ती विरोधात एकवटला आहे. त्यामुळे बोगस मतदार, निवडणूक घोटाळे, शेतकरी आत्महत्या, आरक्षण, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्याचे हे भाजपच्या जिव्हारी लागणारे मुद्दे मागे पडतात. भाषा आणि संस्कृती यांचा अतूट संबंध असते. ती केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची वाहक असते. ती समाजाच्या परंपरा, इतिहास, मूल्ये आणि ज्ञानाचा ठेवा जपते. युनेस्कोच्या अहवालानुसार, जगात सुमारे 7,000 भाषा बोलल्या जातात. त्यापैकी निम्म्याहून अधिक भाषा लुप्त होण्याचा धोका आहे. मागील 100 वर्षांत सुमारे 230 भाषा लुप्त झाल्या. ऑस्ट्रेलियातील आदिवासी भाषा ‘तस्मानियन’ अमेरिकेतील ‘याना’ भाषेच्या लुप्ततेने त्या जमातीचे सांस्कृतिक ज्ञान नष्ट झाले. पाली, प्राकृत भाषा लुप्ततेने बौद्ध संस्कृतीवर परिणाम झाला. तिच्यासोबत ब्राम्ही ही प्राचीन लिपी होती. जी सम्राट अशोकाच्या शिलालेखांसाठी प्रसिद्ध आहे. या भाषा आणि लिपीच्या लुप्ततेने बौद्ध संस्कृतीवर अतिक्रमणे झाली. ती श्रीलंका, थायलंड, म्यानमार यासारख्या देशांत आजही टिकून आहे. भारतातही आंबेडकरी चळवळीने बौद्ध संस्कृतीला पुनर्जीवित केले. नवी पिढी पाली, पाकृत अभ्यासत आहे. मेसोपोटेमियातील ‘सुमेरियन’, इजिप्तमधील ‘कॉप्टिक’, युरोपातील ‘लॅटिन’ भाषा लुप्त झाली. एकेकाळी ती रोमन साम्राज्याची प्रमुख भाषा होती. राज्यात गोंडी, पावरी, कोळी, सामवेदी, कोरकू, कातकरी, वडवळी, मावची, माडिया या भाषा लुप्त झाल्या. अहिराणी, खानदेशी, झाडीबोली लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. ती पाळी मराठीवर येऊ नये. या प्रश्नावर उर्वरित महाराष्ट्रात सामसूम आहे. मुंबई तेवढी जागली. ती सरकारला मराठी अस्मिता दाखवित आहे. ■ ■



भूपेंद्र गणवीर
9850031019

# लोणीकर, इतका माज बरा नव्हे !



माननीय आमदार बबन लोणीकर शेतकरी आणि महाराष्ट्रातील जनतेच्या संदर्भात आपण जे विकृत विधान केले आहे, त्याबद्दल सर्वप्रथम आपला जाहीर निषेध! शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या तुटपुंज्या सुविधा किंवा योजना या नरेंद्र मोदींमुळे किंवा भाजप देत असलेल्या पैशांमुळे लोकांना मिळतात म्हणजे सामान्य जनता तुमच्या भिकेवर जगते अशा प्रकारचे संतापजनक विधान आपण केले आहे. हे विधान म्हणजे समस्त शेतकरी बांधव आणि सरकारच्या योजना स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा जाहीर अपमान असून आपले हे वक्तव्य म्हणजे सत्तेतून आलेली ही मग्रूरी आणि माज आहे हे दिसून येते. इतका माज बरा नसतो. परंतु तुमच्या डोक्यात सत्तेची हवा खोलवर गेलेली आहे हे तुमच्या बोलण्यातून ठिकठिकाणी जाणवते. आपल्या विधानामुळे महाराष्ट्रात संतापाचा उद्रेक झाल्यानंतर आपण जी माफी मागितली त्यामध्ये सुद्धा आपली मुजोरी आणि अहंकार दिसून येतो. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आपणास जागोजागी अडवून जाब विचारणार आहे. आपण शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने खालच्या भाषेत बोलून अपमानित केले, त्याच खालच्या भाषेत आपल्याला उत्तर देणे गरजेचे आहे. बबनराव, शेतकरी त्याच्या कष्टातून आणि घामातून मिळविलेल्या पैशावर आपले कुटुंब चालवतो आणि आपल्यासारखे अनेक राजकारणी जनतेच्या पैशातून मिळालेल्या सुख सुविधा आणि कमिशन खाऊन आपले कुटुंब चालवतात. त्यामुळे शेतकरी आणि आपल्यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे. शेतकरी स्वतःच्या कष्टावर जगतो आणि आपल्यासारखे राजकारणी जनतेचे शोषण करून ऐशोआराम करतात. शेतकऱ्यांच्या अंगावरचे कपडे, त्याच्या चपला, त्याचा मोबाईल हे सर्व त्याच्या कष्टाच्या पैशाचे असतात. परंतु तुमच्या अंगावरचे कपडे, तुमच्या कुटुंबातील सर्वांच्या अंगावरचा एक एक कपडा, तुमच्याकडे असलेल्या गाड्या घोड्या, तुमच्या दोन्ही बायकांकडे असलेली अमाप संपत्ती हे सर्व काही या महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य जनतेच्या कराच्या आणि कष्टाच्या पैशातून आपण गोळा केले आहे. बबनराव, आपल्यासारखे बेईमान राजकारणी हेच खरे या देशातील कष्टकरी, कामकरी यांचे शत्रू आहेत. आपल्यासारख्या कृतघ्न लोकांमुळे या देशातील सर्वसामान्य माणूस हलाखीचे जीवन जगत आहे. अतिशय सर्वसाधारण परिस्थिती असलेले आपल्यासारखे आमदार, खासदार पाच वर्षात जेव्हा कोट्याधीश, अब्जाधीश बनतात तेव्हा हा पैसा आपल्या श्रमाचा, घामाचा नसून जनतेला लुबाडून, फसवून जमा केलेला असतो हे आपण लक्षात घ्यावे. बबनराव, कोणताही राजकारणी शेतात घाम गाळून श्रीमंत होत नसतो. भ्रष्टाचाराच्या पैशातूनच त्यांच्या सगळ्या हाय फाय गरजा पूर्ण होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना बोलण्याचा आपल्याला कोणताही अधिकार नाही. तुमच्या घरातील एकाही वस्तूवर तुमचा अधिकार नसून त्या सर्व वस्तू या महाराष्ट्रातील लोकांच्या पैशातून आपण विकत घेतलेल्या आहे. आपल्यासारख्या नालायक लोकांमुळेच हा महाराष्ट्र दिवसेंदिवस मागे चाललेला आहे. इथला सामान्य माणूस एकजूट नाही. म्हणून आपली बोलण्याची हिंमत होते. कारण आपण इथल्या माणसाला जाती धर्माचे विष देऊन त्यांच्यामध्ये फूट पाडलेली आहे आणि या फुटीचा गैरफायदा घेऊन आपण त्यांच्यावर एकीकडे सत्ता गाजवत आहात आणि दुसरीकडे त्यांचा जाहीर अपमान सुद्धा करत आहात. परंतु याची किंमत आपल्याला नक्कीच चुकवावी लागणार आहे. महाराष्ट्रात फिरताना यापुढे आपल्याला खूप जपून फिरावे लागणार आहे. इथला कष्टकरी जर पेटून उठला तर आपले फिरणे फार मुश्किल होईल. कारण आपण इथल्या सामान्य माणसाच्या आई, बहिणी, बायकोच्या सन्मानावर चिखलफेक करून त्यांची बेइज्जती केली आहे. त्यामुळे आपण कोणत्या संस्कारात वाढलेले आहात आणि आपली लायकी काय आहे हे आता लोकांना कळून चुकले आहे. बबनराव, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी म्हटले होते, ‘ही पृथ्वी शेषनागाच्या फण्यावर उभी नसून इथल्या कष्टकरी, श्रमकरी, कामगारांच्या कष्टावर उभी आहे.’ परंतु हे सत्य नाकारून आपण शेतकऱ्यांच्या कष्टाची खिल्ली उडवली. शेतकऱ्यांच्या स्वाभिमानावर हल्ला करून आपण त्यांना अपमानित केले हे एका दृष्टीने बरेच झाले, कारण आपल्या या विषारी शब्दांमुळे निदान कष्टकरी वर्ग तरी जागृत होईल आणि आपल्यासारख्या विषारी नागांविरुद्ध पेटून तरी उठेल. धर्मासाठी पेटून उठणाऱ्या शेतकऱ्यांना आता समजून येईल की, विषारी डोम्या नागापेक्षा भाजपच्या नेत्यांमध्ये प्रचंड विष भरलेले आहे आणि वेळोवेळी हे विष फेकून ही मंडळी इथल्या बहुजन समाजाला दंश करीत आहे. बरे झाले आपण महाराष्ट्रातील जनतेला त्यांची जागा दाखवून दिली. कारण आता तरी त्यांना तुम्हाला मतदान केल्याचा पश्चाताप होईल आणि भविष्यात तेही तुम्हाला तुमची जागा निश्चितच दाखवून देईल. तुमच्या या नालायकीमुळे महाराष्ट्रातील जनतेला स्वाभिमानाचे भाले फुटून तुमच्या विरोधासाठी ते सज्ज होतील. त्यामुळे तुम्ही महाराष्ट्रातील जनतेचा घोर अपमान करून एका दृष्टीने चांगले काम केले आहे. कारण आता हीच गोष्ट आपल्या सत्तेविरुद्ध लोकांना पेटून उठण्यास कारणीभूत ठरेल आणि सामान्य लोकांच्या उद्रेकात आपण भस्मसात व्हाल एवढे नक्की! ■ ■



प्रेमकुमार बोके
9527912706

वाचकांचे विचारपिठ
बहुजन सौरभ

## इटावा घटनेचा निषेध नोंदवायला हवा!

इटावा येथील हरिकथा पाठक यादवांच्या शेंड्या कापून त्यांना त्या यजमान स्त्रीचे मूत्र प्यायला लावण्याची घडलेली घटना भयानक आहे. तिचा निषेध आपण नोंदवायला हवा. मी स्वतः इतर ग्रूपवर निषेध नोंदवला आहेच. इथेही नोंदवत आहे.

या घटनेनंतर मनुस्मृती दहन दिन मानव मुक्ती दिन म्हणून पाळावा या प्रस्तावाचे गांभीर्य लक्षात येईल. कोणत्याही शूद्राने हिंदू धर्मातील पौरोहित्य करू नये असे म्हणत अमानुषपणे छळ करण्याची, विटंबना करण्याची ही जी घटना आहे. ती मनुस्मृतीमध्ये सांगितलेल्या वर्णव्यवस्थेचे पालन करत नसल्याने आम्ही तुम्हाला सजा करू असे ब्राम्हणवादी सांगत आहेत. आज या घटनेने पूर्ण देश ढवळला गेला आहे. अशावेळी 25 डिसेंबर रोजी अशा शूद्र मानल्या गेलेल्या जातीतील लोकांनी मानव मुक्ती दिन म्हणून तिची प्रतिकात्मक होळी केली, तर हा दिवस मानव मुक्ती दिन म्हणून राष्ट्रीय पातळीवर सुरू राहील आणि भारतीय स्त्री मुक्ती दिवस म्हणून 3 जानेवारी आपण संपूर्ण देशात साजरा केला जावा म्हणून मागणी पुढे नेऊ शकतो. त्यांनी दोन्ही गोष्टींवर केंद्र पातळीवर शासकीय शिक्कामोर्तब होऊ शकेल. इटावा घटनेच्या निषेधार्थ मानव मुक्तीच्या लढ्यातील साथीदारांनी आपण सर्वांनी आवाज उठवायला हवा.

– डॉ. लता प्रतिभा मधुकर



स्त्री स्वातंत्र मुक्तसंवाद

संयोजक
प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. 9130088095

# ‘ती’ च्या हक्काची जाणीव

स्त्रीया या नेहमीच आपला ठसा उमटवित आल्या आहेत. शंभर-दीडशे वर्षांपूर्वीचे चित्र निराळे होते. स्त्रीयांच्या शिक्षणाची पहाट झाली नव्हती. तरी काही भारतीय स्त्रीयांनी उच्च शिक्षणाचा पाया रचला होता. यात आपल्याला महिलांच्या जिद्दीचे दर्शन घडते. या स्त्रीयांच्या यशाच्या कहाण्या नाहीत तर त्यांच्या खडतर, निश्चयी व उदात्त हेतूने केलेल्या बंडखोरीचाही संघर्ष जाणवतो. आताही परिस्थिती काही वेगळी नाही. आताही अशा कितीतरी स्त्रीया आहेत की त्या चांगल्या पदांवर काम करतात. बऱ्यापैकी पगार मिळतो. पण तो पगार त्या नवऱ्याला देतात. मग नवरा उदार होऊन तिला हातखर्चाला पैसे देतो. स्त्रीचा पैसा तिच्याकडे नको का? असे विचारले की, बायकांना काही अक्कल नसते, त्यांच्या हातात पैसा टिकत नाही. हे ऐकायला मिळते.

‘गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या’ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाक्य मला इथे आठवते. स्त्रीया निगुतीने कष्ट करतात. पण त्या कष्टाचा मोबदला त्यांच्या खात्यात जमा होत नाही. घराघरात हाउस लाईफ बायका दिवसभर घरातील नानाविध कामे करतात. त्यांच्या कामाची यादी तशी मोठीच आहे. दुसरीकडे बघता घराबाहेर पडून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांची त्यांच्या कमाईच्या पैशावर मालकी हक्काची भावना नाही. दैनंदिन प्रवासासाठी, खर्चासाठी उदार मनाने पुरूषवर्ग पैसे काढून देतो. अतिशयोक्ती वाटतेय पण अनेक कुटुंबात ही वस्तुस्थिती आहे. स्त्रीयांना त्यांच्या कामाचा मोबदला देताना भेदभाव केला जातो. पुरूषांच्या श्रमांना स्त्रीयांच्या श्रमापेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेविरूद्ध लढण्याचा मंत्र सांगून ठेवला आहे. गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या. म्हणजे तो बंड करून उठेल. आपल्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांनी लढायला पाहिजे. आपण करतो त्या कष्टाचा योग्य मोबदला आपणास मिळायलाच हवा असे वाटायला पाहिजे. स्त्रीयांना त्यांच्या गुलामगिरीची, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव व्हायला पाहिजे. निःस्वार्थी भावनेने घर सांभाळणाऱ्या स्त्रीने महिन्याला आपल्यासाठी काही का होईना छोटीशी तरी रक्कम






स्वतःसाठी ठेवायला हवी. ही लढाई मात्र स्वतःच लढायची असते. सगळ्याच लढाया रस्त्यावर उतरून करायलाच हव्या असे नाही. काही लहान-मोठ्या लढाया आपल्याला आपल्या घरातही लढाव्या लागतील. समान वेतन हे सुत्र आपल्या संविधानात मार्गदर्शक तत्वात अनुस्यूत आहे. तेव्हा संविधान समजून घेऊन आपले अधिकार मिळवता आले पाहिजे. स्त्रीलाही काही हौस मौज करायची असेल तरी नवऱ्यावर अवलंबून रहावे लागते. सुशिक्षीत स्त्रीयांची हीच परिस्थिती आहे. सावित्रीबाई फुले यांच्या कृपेने शिकून सवरून आपण मोठ्या होत आहोत. मग आर्थिक सक्षमता आणि अर्थ साक्षरता यामध्ये मागे रहायला नको. असंघटित स्त्री यांबद्दल तर बोलायलाच नको, गवंडी काम, सफाई कर्मचारी, शेतमजूर, विट भट्टीवर काम करणाऱ्या स्त्रीयांना त्यांनीच दिवसभर उन्हातान्हात केलेल्या कष्टाची कमाई कधी आणि कशी मिळेल याची खात्री नसते. आपण कितीही पुढारलो, सुधारलो, लाडक्या बहिणी झालो तरी स्त्री-पुरुष समानतेबाबत ‘बुडाखाली अंधार’च आहे. तिच्या कामाच्या तासांचा हिशेब केला तर पुरुषांपेक्षा जास्तच असतील. पण तिचे पासबुक मात्र रिकामे. तिच्या कष्टाचा हिशेब लागतच नाही. एवढे असूनही महिला वटसावित्री व्रत पतीला दिर्घायुष्य लाभावे म्हणून करतेच. म्हणजे तिच्यात किती सोशिकता, प्रेमळ भावना, निष्ठा आणि आत्मबलच म्हणावे लागेल. आमची सावित्रीबाई फुले पतीसोबत काम करून नियती म्हणजेच समाजालाही आव्हान देणारी होती. तिच्या चेहऱ्यावर ना भीती होती ना विनवणी होती. स्त्रीयांना बुद्धीमत्ता लाभावी या ध्येयाचा ध्यास. वडाचे झाड माणसासाठी आधारवडच आहे. ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण देते. आजची स्त्री सुद्धा कुटुंबासाठी बांधिलकी दर्शवते. तिचे जीवनचक्र, तिचा आत्मसंवाद आणि तिचा निर्धार जणू आजच्या काळातील ती सुद्धा सावित्रीच. शिक्षिका, डॉक्टर, पोलिस, अग्निशमन दलातील महिला या साऱ्या सावित्रीबाई फुलेंच्याच अनुयायी आहेत. त्यांच्या जिद्दीला आपण सर्व स्त्रियांनी सॅलूट करायलाच पाहिजे. ■ ■

मंदाकिनी काकडे,
मो.86000 17963




# आरटीआय वापराने सुप्रीम कोर्टाने दिला आरक्षणाचा निर्णय

**आरटीआयचा वापर करून सर्व न्यायिक कर्मचाऱ्यांसाठी आरक्षणासाठी प्रयत्न 20 फेब्रुवारी 2025 रोजी, नागपूर, महाराष्ट्र येथील संजय थुल यांनी न्याय विभागाकडे एक आरटीआय अर्ज दाखल केला, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमध्ये नियुक्ती आणि पदोन्नतीसाठी अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) कर्मचाऱ्यांसाठी, विशेषतः न्यायिक नसलेल्या कर्मचाऱ्यांसाठी आरक्षण धोरणांबाबत माहिती मागवली होती. हा अर्ज क्रमांक JUST/CJ/R/25/00625 अंतर्गत नोंदवला गेला होता आणि सर्व उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात आला.**

संजय थुल हे एक नामांकित आरटीआय कार्यकर्ते आहेत, जे सेवानिवृत्त जीएसटी सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत होते आणि सध्या अखिल भारतीय जीएसटी एससी/एसटी कर्मचारी कल्याण संघटनेचे अध्यक्ष आहेत. त्यांचा दीर्घकाळाचा अनुभव आणि सामाजिक न्यायासाठी असलेली बांधिलकी त्यांच्या कार्याला दिशा देते. प्राप्त माहितीनुसार, अनेक उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने सर्व कर्मचारी गटांसाठी आरक्षण धोरणे लागू केलेली नव्हती, जे मुख्यतः न्यायिक नियुक्त्यांपुरती मर्यादित होती. या त्रुटीवर उपाय करण्यासाठी ठाम असलेल्या संजय यांनी 27 मे 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयाला ईमेल पाठवला, ज्यामध्ये सर्व कर्मचारी, विशेषतः न्यायिक नसलेल्या भूमिकांसाठी, एससी/एसटी आणि ओबीसी समुदायांसाठी समान प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी आरक्षण वाढवण्याची विनंती केली. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले, जेव्हा 26 जून 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावर एक ऐतिहासिक परिपत्रक जारी केले. हे परिपत्रक, सक्षम प्राधिकाऱ्याच्या दिशानिर्देशानुसार आणि न्यायालयाच्या अंतर्गत नेटवर्क (सुपनेट) वर अपलोड करण्यात आले, ज्याने 26 जून 2025 पासून औपचारिक आरक्षण धोरण सुरू केले. "Res. Roster/01/2025÷ या 167 पृष्ठांच्या कागदपत्रात, 1961 च्या सर्वोच्च न्यायालय अधिकारी आणि कर्मचारी (सेवा आणि वर्तन) नियमांचे नियम 4ए आणि 1997 च्या कर्मचारी प्रशिक्षण विभाग (डॉप्ट) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणारा 200-बिंदू आरक्षण फ्रेमवर्क आखला गेला. यामध्ये सर्व कर्मचारी पदांसाठी, जसे की रजिस्ट्रार, वरिष्ठ वैयक्तिक सहाय्यक, सहाय्यक ग्रंथपाल, ज्युनिअर कोर्ट सहाय्यक, चेंबर परिचारक आणि इतर न्यायिक नसलेल्या भूमिका यांच्यासाठी एससी कर्मचाऱ्यांसाठी 15टक्के आणि एसटी कर्मचाऱ्यांसाठी 7.5टक्के कोटा निश्चित केला गेला. हे धोरण थेट भरती आणि पदोन्नती दोन्हींसाठी लागू होते, ज्यामध्ये प्रत्येक गटासाठी सविस्तर बिंदू-आधारित माहिती दिली गेली. सुरुवातीच्या आरक्षण नोंदवही देखील लाइव्ह दस्तऐवज म्हणून सुरू करण्यात आली, ज्यामध्ये कर्मचाऱ्यांना पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी रजिस्ट्रार (भरती) यांच्याकडे हरकती नोंदवण्याची तरतूद होती. ही प्रगती, अनुसूचित जातीमधील दुसरे मुख्य न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्या कार्यकाळात झाली, ज्याने न्यायिक प्रशासकीय फ्रेमवर्कमध्ये विविधतेची बांधिलकी दर्शवली. संजय यांच्या आरटीआय-प्रेरित उपक्रमाने सर्व कर्मचाऱ्यांसाठी आरक्षणाचा अभाव उघड केला आणि सामाजिक न्यायासाठी संस्थागत पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला, जे कायमस्वरूपी प्रेरणा देणारे आहे. ■ ■

यशोगाथा

“ जीवनातील खरी सुख-शांती अहंकारमुक्त जीवनात आहे. ”



# बौद्धांचे जात प्रमाणपत्र

**1999 ला केंद्र सरकारने धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण लागू केले. परंतु अनुसूचित म्हणजे केंद्र सरकारच्या अनुसूचित जातीच्या यादीत बौद्ध अनुसूचित जातीतून धर्मांतरित यांना समाविष्ट केले नाही. जात किंवा प्रवर्ग, समूह अनुसूचित असल्याशिवाय आरक्षण दिले जात नाही हा कायदा आहे. अनुसूचित पूर्वाश्रमाची जात महार आहे बौद्ध नाही, म्हणून समस्या उद्भवत असतात.**

जून-जुलै महिन्यात मेडिकल इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश सुरू होतात आणि बौद्धांना जातीच्या दाखल्यावरून उद्भवणाऱ्या समस्या उजागर होतात. शाळेत प्रवेश घेतांना धर्म व जात लिहावी लागते. तेव्हा बौद्ध धर्माची नोंद करताना पालकांना अडथळे निर्माण केले जातात. पालक लोक मला फोन करतात म्हणून हा मुद्दा समजून घेण्यासाठी हा लेख लिहत आहे.

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीचे दोन नमुन्यात दाखले दिले जाते. यासाठी अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय यांना दाखला देणे कायदा 2000 व त्या अनुषंगाने नियम 2012 राज्य सरकारने निर्गमित केले आहेत. या नियमात विविध वर्ग गटांना देण्यासाठी जाती नमूने विहित केले आहेत.

नमूना 6 हा अनुसूचित जातीसाठी दिला जाणारा नमूना आहे, हा केंद्र सरकारचा विहित नमूना आहे. यात दाखलाधारकाची जात लिहून असते व तो महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा आहे असा उल्लेख असतो उदाहरणार्थ अशोक ही व्यक्ती महार जातीची असून ती महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीची आहे, असा दाखला असतो. हा दाखला राज्य व केंद्र सरकारच्या कार्यालयात लागू आहे.

नमूना 7 हा सुद्धा जाती प्रमाणपत्र नमूना आहे. पण हा धर्मांतरित बौद्ध असा उल्लेख करून दिल्या जातो, उदाहरणार्थ अशोक ही व्यक्ती पूर्वी महार या अनुसूचित जातीची होती. आता ते धर्मांतरित बौद्ध आहे. हा नमूना 7 महाराष्ट्र सरकारने निर्माण केला असल्याने तो फक्त राज्य सरकारच्या कार्यालयात स्वीकारल्या जातो. केंद्र सरकारच्या कार्यालयात स्वीकारल्या जात नाही.

गेल्या एका विधान सभेच्या अधिवेशनात आमदार भाई गिरकर यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावर तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी सविस्तर उत्तर दिले व दोन्ही नमूने राज्य शासन देते. परंतु नमूना 7 केंद्र सरकार स्वीकारत नाही ही वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली. त्यांच्या पूर्वीच्या सामाजिक न्यायमंत्र्यांनी नमूना 7 केंद्र सरकारने स्वीकारावा यासाठी केंद्राला पत्र लिहले होते व त्यावर नकार कळविण्यात आला हे सुद्धा मंत्री महोदय धनंजय मुंडे यांनी सभागृहात सांगितले होते. त्यापुढे जाऊन ते म्हणाले की या विषयावर व्यापक चर्चा करून निर्णय घेता येईल.



**अनिल वैद्य**
माजी न्यायाधिश
9657758555

मुद्दा असा आहे की, 14 ऑक्टोबर 1956 डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले त्यावेळी धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे केंद्र सरकारचे आरक्षण मिळत नव्हते, रिपब्लिकन नेते व जनतेच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मात्र महाराष्ट्र राज्यात 1960 पासून धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण लागू केले, हा फार धाडसी निर्णय होता. कारण एखाद्या जातीला किंवा समूहाला अनुसूचित जातीचे आरक्षण देण्याचे अधिकार संविधान अनुच्छेद 341 नुसार केंद्र सरकारला आहे, असे असतांनाही राज्य सरकारने आरक्षण दिले ही विशेष! 1962 ला धर्मांतरित बौद्धांना देण्यासाठी अनुसूचित जातीचा वेगळा नमूना सुद्धा निर्गमित केला. नंतर 1962 ला महाराष्ट्र सरकारने मागासवर्गीय समूहाच्या अरक्षणाबाबत सूचना देण्यासाठी बी. डी. देशमुख समिती गठीत केली. त्यात सात सदस्य होते. आर. डी. भांडारे हे रिपब्लिकन नेते सुद्धा सदस्य होते. त्यांनी धर्मांतरित बौद्धांच्या अरक्षणाची जोरावर शिफारस केली. सुमारे 200 पाने त्यावर अहवालात जोडली. बी. डी. देशमुख समितीने अनुसूचित जाती व धर्मांतरित बौद्ध हा प्रवर्ग सुचविला. तो राज्य सरकारने स्वीकारला.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन (रिझोलुशन), सचिवालय दि. 9 एप्रिल 1965 नुसार Scheduled caste and scheduled caste convert to Buddhism हा प्रवर्ग लागू करण्यात आला. धर्मांतरित बौद्धांच्या मागणीनुसार हा प्रवर्ग राज्य शासनाने बी. डी. देशमुख समितीच्या शिफारशीनुसार लागू केला. त्यावेळी केंद्रात किंवा देशात कुठेही बौद्धांना आरक्षण नव्हते. राज्य सरकारने आपल्या जनतेची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार म्हणजे वरील ठराव एप्रिल 1965 नुसार धर्मांतरित बौद्धांना जातीचे प्रमाणपत्र सरकारने दिले. बी. डी. देशमुख समितीनुसार. यामुळे महाराष्ट्र सरकार नमूना 7 मध्ये धर्मांतरित बौद्ध असा अनुसूचित जातीचा दाखला व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सुद्धा देत असते व ते महाराष्ट्र राज्यातील सर्व कार्यलयायात, शैक्षणिक संस्थेत लागू आहे. परन्तु केंन्द्र सरकारच्या कार्यालयात व शैक्षणिक संस्थेत स्वीकारल्या जात नाही.




1999 ला केंद्र सरकारने धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण लागू केले. विद्यार्थ्यांना ही बाब माहिती नसल्याने ऐनवेळी फजिती होत असल्याचे दरवर्षी काही उदाहरणे पुढे येतात, 2012 ला मुंबईचे डॉ. विजय गायकवाड, केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सादर केलेला धर्मांतरित बौद्ध हा दाखला स्वीकारला नाही व त्यांची निवड रद्द झाली, 2020 ला कल्याण येथील हर्षल रतन रामटेके या विद्यार्थ्यांचा केंद्रीय अभियांत्रिकी महाविद्यालयात नमूना 7 धर्मांतरित बौद्ध नमूद केलेले दाखला स्वीकारला नाही, ऐनवेळी त्याला साकोली येथे मूळ गावी जाऊन आपण महार असल्याचा नमूना 6 दाखला प्राप्त करावा लागला तेव्हा प्रवेश मिळाला. सागर माळवे या मुंबईत राहणाऱ्या विद्यार्थ्यांची रिझर्व बँकेत निवड झाली असता रिझर्व बँकेने धर्मांतरित बौद्ध नमूना 7 स्वीकारला नाही. ऐनवेळी त्यानी आपल्या पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्याच्या कार्यालयातून महार असल्याचा दाखला मिळविला तेव्हा रिझर्व बँकेने रुजू करून घेतले. यावरून आत्मसन्मान चळवळीत कार्यरत समाज धुरीणांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. बौद्धांना बौद्ध असल्याचा दाखला बदलून महार असल्याचा दाखला देण्याची नामुष्की येत असेल तर त्यावर कायद्यात असलेल्या मार्गाने मात केली पाहिजे.

क्रमशः ■ ■

# दरवाजा मनाचा

**अनंतायन**



**ॲड. अनंत खेळकर**
मो. 9370061677

गुरूजी आज मुलांना सांगत होते. मुलांनो! आज ह्या शाळेतील तुमचा शेवटचा दिवस आहे. पुढीलवर्षी तुम्ही महाविद्यालयात जाणार आहात. आज पुस्तकातील धड्याऐवजी मी तुम्हाला काही वेगळे सांगणार आहे. परिक्षेत गुण कमी पडले तरी काही बिघडणार नाही. पुन्हा नव्या जोमाने अभ्यास करा यश नक्की मिळेल. महाविद्यालयात तुम्ही जर एखाद्या स्पर्धेत मागे राहीले तर निराश होऊ नका. एखाद्या दिवशी मनासारखे घडले नाही म्हणून त्रागा करू नका. कधी-कधी तुम्ही घेतलेला एखादा निर्णय चुकला तर त्यात वाईट वाटण्यासारखे काहीच नसते. लक्षात ठेवा! आयुष्यात त्याच व्यक्तीकडून चुका होतात जी व्यक्ती निर्णय घेत असते तिच्याकडूनच चूक होते. आयुष्यात यश, अपयश ह्या दोन्हीही गोष्टींना सामोरे जावे लागते म्हणून यशाने हुरळून जाऊ नका अन् अपयशामुळे धीर खचू देऊ नका. आज एखाद्या व्यक्तीशी चांगले संबंध आहेत पण जर पुढे ते टिकुन राहिले नाहीत. त्याने साथ सोडली तर आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. जर तुम्ही बरोबर असाल तर ती व्यक्ती सोडून गेल्याचे दुःख मनाशी बाळगू नका. असे म्हणतात माणूस हा चुकांचा पुतळा आहे. ह्याचाच अर्थ असा आहे की, जशी आपण चुक करतो तशी आपल्या संपर्कातील व्यक्ती देखील चुकत असते. जर चांगल्या व्यक्तीकडून एखाद्यावेळेस काही चुक झाली तर सहन करावी. कारण हिरा कचऱ्यात जरी पडला तरी त्याची किंमत मुळीच कमी होत नसते. आपल्या आयुष्यात अचानक अशा काही घटना घडतात की, ज्यावर आपले नियंत्रण नसते. मन दुखावले जाणे, निराशा पदरी पडणे, अपयश येणे, कुणी आपली साथ सोडून जाणे. ह्या किंवा ईतर अनेक घटना घडत राहणार आहेत. म्हणून काही आयुष्य थांबत नसते. पण परिस्थिती सर्वकाळ सारखी राहत नसते. म्हणून हिम्मत सोडू नका. एक खुणगाठ मनाशी पक्की बांधून ठेवा. कमाई म्हणजे केवळ सांपत्तिक स्थिती नव्हे तर आर्थिक विकासासोबतच आपले विविध अनूभव, जिवाभावाची नाती, मानसन्मान, सुंदर विचार, जिवलग मित्र ही आयुष्याची खरी कमाई आहे. शेवटी एकच गोष्ट तुम्हाला सांगायची आहे की, तुम्ही कितीही मोठे झाले तरी तुम्ही तुमच्या आईवडीलांना विसरू नका. त्यांचा आदर करा. कारण ह्या जगात आई आणि वडीलांच्या मनाचा दरवाजा असा आहे की, जो दरवाजा ठोठावायची गरज नसते. हा दरवाजा त्यांनी आपल्या लेकरांसाठी कायम उघडा ठेवलेला असतो. पण जर काही कारणाने हा दरवाजा एकदा का बंद झाला तर जगातील कोणत्याही पश्चातापाच्या चाबीने तो उघडल्या जात नाही. तो दरवाजा बंद होऊ नये ह्याची कायम खबरदारी घ्या! परिक्षेत तुम्हाला भरभरून यश मिळो. आयुष्यात उंच-उंच भरारी घ्या, यशवंत, किर्तीवंत व्हा! आणि हो ! मी तुम्हा सर्वांवर मनापासून प्रेम करतो. आयुष्यात माझी जर कुठे आवश्यकता असेल तर जरूर या. माझ्याही मनाचा दरवाजा तुमच्यासाठी कायम ऊघडा आहे. जा बाळांनो! आनंदात रहा! आभाळभर आशिर्वाद! ■ ■

बहुजन सौरभ

# बौद्ध विद्यार्थ्यांना संरक्षण कधी देणार?




2 जून 2025 रोजी कर्जत येथील डॉ. एन. वाय. तासगावकर महाविद्यालय ऐरणीवर आले. अरहंत लेंडाणे या 21 वर्षीय बौद्ध विद्यार्थ्याला 12 सिनीयर्स व उच्चवर्णीय विद्यार्थ्यांनी रॅगींग करून जातीवाचक शिवीगाळ केली. लाथा, बुक्क्यांनी व हॉकीस्टीकने अमानूष मारहाण केली. अरहंत तक्रार करेल म्हणून त्याला एका खोलीत डांबून ठेवले. तू महारड्या, कमी मार्क्स घेऊन आला व आमच्यात बसला, लायकी नसतांना डॉक्टर बनायला आला, अशी जातीवाचक शिवीगाळ केली. 22 जून 2025 रोजी अरहंतने त्याच्यावर झालेल्या मारहाणीचे फोटो आईवडिलांना पाठवले.

महाविद्यालयात रॅगिंग हा शब्द अनेकदा ऐकण्यात येत असतो. रॅगिंग म्हणजे छळणूक, जातीय भेदभाव करणे! रॅगिंग हे अक्षम कृत्य आणि गुन्हा समजला जातो. हा प्रकार मागासवर्गीयांसाठी नवीन नाही. त्यांना अनेक प्रसंगी अनेक प्रकारच्या छळणूकीला नेहमीच समोर जावे लागत असते. मेडिकल, इंजिनियरिंग कॉलेजमध्ये अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांवर विविध प्रकारचे अत्याचार नित्याच्याच घटना असतात. त्यांच्या शिक्षणात असंख्य अडचणी आल्यामुळे ते दबावात असतात, त्यांच्या स्वास्थ्य व अभ्यासावर दुष्परिणाम होत असतो. शिक्षण हे संवैधानिक मूलभूत गरज समजली जाते. परंतु वरील संकटाचा सामना करताना अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्णत्वास जात नाही. बहुतांश प्रकरणात कॉलेज प्रशासन, पोलिसांच्या भीतीमुळे व त्यांच्या निष्क्रीयतेमुळे बहुतांश प्रकरणे उजेडात येत नाहीत. यापूर्वी आदिवासी समाजातील डॉ. पायल तडवी जातीय भेदाभेदीचा बळी पडली आहे. डॉ. पायल या एमडी चे शिक्षण घेत असता जातीयतेच्या अमानुष अत्याचारामुळे त्यांनी आत्महत्या केली होती. जातीय अत्याचाराचा संघर्ष करत असता रोहित वेमुलाने सुद्धा आत्महत्या केली होती. या दोन्ही दलित विद्यार्थ्यांच्या मातांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने यूजीसीला उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांवर होणारे अत्याचार, विशेषतः रॅगिंग, लैंगिक छळ व जातीय भेदभावाला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी,ठुह्ल4 रॅगिंग पथकाची नेमणूक करणे, विद्यार्थ्यांत समानतेची भावना वाढविण्यासाठी असणारे उपाय सुचविल आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक तत्वे जाहीर करावे, कायद्याची अंमलबजावणी करण्यास कुलगुरू, कुलसचिव व अन्य अधिकारी यांनी जबाबदारी घेतली पाहिजे, असे निर्देश व सूचना सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाची सरकारने वा विद्यापीठाने अजूनही दखल घेतल्याचे दिसत नाही. अरहंतवर अत्याचार करणाऱ्या 12 आरोपींना अजूनही पकडले नाही. त्यांना त्वरित कॉलेजमधून बरखास्त करणे ही गरजेचे आहे. आरोपी विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची मागणी अरहंतच्या आई मेनका लोंडाणे यांनी तासगावकर कॉलेजकडे केली आहे. कोणत्याही प्रकारची जातीयता, भेदभाव करणे हे संविधानाच्या कलम 15 नुसार कायदेशीर गुन्हा ठरविण्यात आला आहे. अरहंतवर केलेले अत्याचार हे संविधान विरोधी कृत्य आहे. वेळीच शिक्षा होणे गरजेचे आहे. पुन्हा पायल तडवी होण्याची प्रशासन वाट पाहत आहे काय? असा सामान्यांना प्रश्न निर्माण झाला आहे. ■ ■



**श्रीराम बनसोड**
मो. 8208617748

# दादासाहेब उर्फ बाळाराम रामजी आंबेडकर

दादासाहेबांच्या अनपेक्षित मृत्यूने माझा सल्लागार नाहीसा झाला, डॉ. साहेबांचा प्रेमळ सहोदर गडप झाला. समाजाला सुधारणेच्या मार्गावर आणण्यासाठी अविश्रांत श्रम करणारा एक जातिवंत समाजनायक नाहीसा झाला. दादासाहेबांचे चरित्र अपूर्व आहे, स्थलसंकोचास्तव ते येथे इत्यंभूत मला देता येत नाही. याबद्दल फार वाईट वाटते.

अफगाणिस्तानच्या समरांगणावर समशेरबहादुरी करून प्रख्यात पावलेले पुण्यप्रतापी रामजी मालोजी सुभेदार आणि पुण्यस्मरण चिरंजीविनी मातोश्री भीमाबाई यांना अकरा अपत्ये (एकूण चौदा अपत्ये पैकी तीन मुलगे आणि चार मुली ह्यात व इतर सात लहान असतानाच निधन पावले.) झाली, यापैकी आठ मुली व तीन मुलगे. बाळाराम, आनंदराव आणि भीमराव होत. त्यापैकी आनंदराव 1914 साली दिवंगत झाले.

**डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम यांना रविवार ता.12/11/1927 रोजी दुपारी बारा वाजता मुंबई येथे एकाएकी हृदयक्रिया बंद पडून देवाज्ञा झाली, हे हृदयद्रावक वर्तमान बहिष्कृत भारताच्या वाचकांना कळविण्याचा कठोर प्रसंग माझ्यावर गुदरला आहे. दादासाहेबांचा व माझा परिचय झाल्यापासून त्यांनी माझ्या शिक्षणासाठी जिवापाड मेहनत घेतली, अंगात ताप असतानाही माझ्यासाठी त्यांनी धावपळ केली हे स्मरले म्हणजे अंतःकरण भरून येते.**

दादासाहेब फर्स्ट ग्रेनेडियर फलटणीत बँडमन होते. फलटणीत असतानाच त्यांचे शिक्षण इंग्रजी पाच सहा इयत्तेपर्यंत झाले होते. काही दिवसांनी ते फलटणीतून मुंबईत आले व म्युझिकच्या धंद्यावर उपजीविका करु लागले. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. पैकी फक्त सौ. सखूबाई तांबुसकर याच ह्यात आहेत. फलटणीत इंग्रजी भाषेचे कितीसे ज्ञान होणार? मुंबईत आल्यावर दादासाहेबांनी स्वतःच्या हिंमतीने इंग्रजी भाषेचा एवढा अभ्यास केला की, ते विश्वविद्यालयाच्या पदवीधरांपुढे इंग्रजीतून व्याख्यान देऊ शकले. त्यांचे वाचन भारी दांडगे होते. अशा प्रकारच्या स्वाध्यायाने त्यांच्यात एक विशेष प्रकारची धडाडी उत्पन्न झाली होती. या स्वाध्ययन शीलावर ते मुंबई म्युनिसिपालिटीत (भायखळा) येथे पदवीधराबरोबर पगार घेऊन कारकूनाचे काम करीत होते. सामाजिक कार्यात त्यांचा लहानपणापासून हात असे. जातींतील बैठकीत लोक त्यांचा फार आदरसत्कार करीत. 1919 पासून ते सामाजिक चळवळीत प्रामुख्याने भाग घेऊ लागले व डॉ. साहेब लंडनला बॅरिस्टरच्या कोर्ससाठी गेले तेव्हा सामाजिक चळवळीत जी बजबजपुरी माजली ती नाहीशी करून चळवळीला चलन देण्याचे ज्या लोकांनी प्रयत्न केले, त्यात दादासाहेब अग्रेसर होते. 1922 च्या अखेर तर चळवळीची सूत्रे त्यांच्याच हातात अवचित आली होती, ती त्यांनी यशस्वी रीतीने हलवून दाखवली.

ते प्रत्येक सभेला हजर राहात असत. त्यांची भाषणे जोरदार, दणदणीत व आकर्षक असत. त्यांची व्याख्याने ऐकल्यावर प्रत्येक श्रोता चैतन्यपूर्ण होऊन जात असे. सामाजिक चळवळीबद्दल ते एक पुस्तक लिहिणार होते. त्याची पहिली दोन प्रकरणे मी वाचली होती. प्रकृती नेहमी नीट रहात नसल्यामुळे ते पुस्तक अपूर्णच राहिले. विद्यार्थ्यांच्या सोयीबद्दल त्यांचे विचार फार मननीय होते. विद्यार्थींची राहण्याची, खाण्याची व पोशाखाची व्यवस्था त्यांच्या इच्छेप्रमाणे झालीच पाहिजे असे ते म्हणत. विद्यार्थ्यांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे. एका गरीब विद्यार्थ्याला त्यांनी आपल्या घरी 3/4 महिने ठेविले होते. त्याला विलायतला पाठवावयाचे असे ते नेहमी म्हणत.




ते फार प्रेमळ, सरळ, मनमिळाऊ, करारी, निर्भिड व विनोदी होते. मनुष्यस्वभावाची पारख ते लवकरच करीत. स्वतःच्या कर्तबगारीने प्यादापासून सव्वाशे रूपये पगाराच्या कारकुनाची जागा यशस्वी चालविणारा दादासाहेबांसारखा स्वाध्यायशील कर्मवीर स्पृश्य वर्गातही सापडणे कठीण मग अस्पृश्य वर्गाचे नाव कशाला? गेल्या दोन वर्षात ते खाजगी बैठकीत उद्गार काढीत की, ‘मला पेन्शन सुरु झाले की झोळी अडकावून बहिष्कृत हितकारिणी सभेकरिता मदत मागण्यास मी वाटेल तिकडे फिरेन!’ पण दैवाची विचित्र लीला! पेन्शन चालू व्हावयास अवघे 6 महिने राहिले होते. इतक्यात क्रूर काळाने त्यांच्यावर झडप घातली. कालाय तस्मे नमः।

ते साठीच्या घरात आले होते. तरी त्यांचा जोम अडाखेबाज तरुणाप्रमाणे होता. व्यासपीठावर पाय ठेवला की, त्यांच्या अंगात चैतन्य शिरे आणि आपल्या तडफदार भाषणाने ते श्रोत्यांच्या अंगावर रोमांच थरारवीत. स्पृश्यांचा बहिष्कृतांना चोहोंकडून प्राणांतिक त्रास होतो आणि मा-बाप सरकार त्यांच्या रडण्याकडे ढुंकूनही बघत नाही, अशा आशयाच्या विषयावर ते बोलू लागले म्हणजे आवेशाने उद्गारत, ‘आमची गुलामगिरी आम्हीच नाहीशी केली पाहिजे. कोणाची कशाला मदत मागता? उठा! कंबर कसा आणि सामाजिक बंडाची उभारणी करा! सर्व देशात क्रांती करा आणि गुलामगिरीतून सुटका करा. या बंडात मरणे म्हणजे फार भाग्याचे आहे. मी महाडच्या सत्याग्रहात मरणार आहे.’

... हाय!

कोण ही हृदयविदारक भविष्यवाणी!

दादासाहेबांनी मृत्यूबद्दल विचार केला असेल, मी कधी मरेन? त्याचे उत्तर त्यांनीच ता. 6/10/1927 रोजी दसऱ्याच्या सीमोल्लंघन संमेलनात जाहीर केले.

*सतांहि संदेहपदेषु वस्तुषू।*
*प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः ॥*
*- कालिदास*

दादासाहेब! महाडच्या जलसंगरात आपणाला समशेर गाजविण्याची परमेश्वराने मुभा दिली नाही. त्याने तुम्हला लवकरच बोलविले. काही तरी विशेष जरूरीचे काम असेल. ते संपताच आम्हांला दुसऱ्या देहाने लवकरच भेटा! नंतर आपण सामाजिक बंडाची उभारणी करू! त्यांच्या प्रेतयात्रेला अस्पृश्य समाज तीन हजारावर होता. प्रेतयात्रा स्मशानात गेल्यावर तेथे मेसर्स शिवतरकर, मोरे, गंगावणे, शिवदास नङ्गवाकर वगैरे मंडळींची मृताच्या गुणवर्णनपर भाषणे झाली.

(ले. एक विद्यार्थी)
बहिष्कृत भारत,
शुक्रवार ता. 25 माहे नोव्हेंबर सन 1927
मुक्तीदाता विशेषांक

महत्वाचे माझ्या वडील बंधूच्या मरणसमयी मी मुंबईत नव्हतो. अंबादेवीच्या सत्याग्रहासाठी जी अमरावती येथे ता. 13 नोव्हेंबर रोजी माझ्या अध्यक्षतेखाली परिषद भरण्याचे ठरले होते, त्या परिषदेला मी गेलो होतो. माझ्या गैरहजेरीत ज्या 3/4 हजार अस्पृश्य बंधूनीं प्रेतयात्रेस हजर राहून असल्या दुःखप्रसंगी आपली सहानुभूती दर्शविली त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. ■ ■

**भीमराव आंबेडकर**

# राजर्षी शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी समाज सुधारक

*राजर्षी शाहू महाराज हे लोकशाहीवादी, समाज सुधारक आणि सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवल्या गेली. 1894 मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून तर 1922 त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास वर्गातील, लोकांसाठी काम केले. जात पंथाची परवा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे याला प्रथम स्थान देऊन, सर्वात महत्त्वाचे कार्य केले.*

ब्रिटिशांच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी शाहू महाराजांनी अथक प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. तसेच सनातन धार्मिक वर्गाच्या विरोधाला न जुमानता, दलित अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षी ही पदवी त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळेस, त्यांच्या छात्र गुरुने त्यांना दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख अनमोल, समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र असे सुद्धा म्हणतात. राजर्षी शाहू महाराजांनी 1894 मध्ये संस्थानाच्या राज्यकारभार स्वीकारला. राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती, गरजा, त्यांची दुःखे जाणून घेतली. सामान्य जनतेच्या भावना ओळखून, त्यांच्या दुःखाचे निवारण करण्यासाठी आयुष्यभर काम करत राहिले. अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता निपटून काढल्याखेरीज, आपल्या प्रजेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाही, असे त्यांना सतत वाटायचे. यासाठी महाराजांनी स्वतःच्या घरापासून सुरुवात केली. महाराज एकदा शिरोळ्ला शिकारीला गेले असता, तेव्हा महाराजांनी चहासाठी म्हणून शिरोळच्या महाराना, त्यांच्या तक्त्यात सर्वांची सोय करावयास सांगितली. महारांना आपल्या घरात घेण्यापेक्षा, त्यांच्याच घरात आपण जाऊन जेवण किंवा फराळ करणे, ही किती मोठी पुढची पायरी त्यांनी गाठली. त्यातही महाराज शिरोळच्या तक्त्यात एकटेच गेले नाही, तर त्यांनी आपल्या कुटुंबातील स्त्रियांना त्यात सहभाग घेता यावा म्हणून, हळदीकुंकू समारंभ करायला लावला व त्या ठिकाणी महाराणी लक्ष्मीबाई सोबत, कन्या अक्कासाहेब महाराज व सून इंदुमती देवी यांना मुद्दाम बोलावून घेतले आणि इंदुमतीदेवींला ते चार शब्द बोलायलाही लावले. एवढ्यावरच थांबले नाही तर महाराजांनी ब्राम्हण पुरोहिताचे मक्तेदारी काढून, बहुजन मराठा समाजातील पुरोहितांचे शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना स्थापना केली आणि मराठा पुरोहित तयार करून क्षात्रगुरुचे पद निर्माण केले. तरीही नवीन पुरोहितावर सामान्य जनतेचा विश्वास बसने गरजेचे होते. सनातनी मराठ्यांना सुद्धा मराठा पुरोहित ही गोष्ट मान्य नव्हती, पण महाराजांच्या दडपणामुळे त्यांना नमते घ्यावे लागले. पूर्वी भट ब्राम्हणाशिवाय पान हलत नव्हते. तिथे भट ब्राम्हणांना न बोलावता पुरोहितांशिवाय पूजा, विधि होऊ लागली. परंतु स्वतः महाराजांच्या राजवाड्यात ही सुधारणा अप्रिय वाटत होती. आपल्या राजवाड्यातील खाजगी देवालयातील ब्राम्हण पुजाऱ्यांना महाराजांनी काढून टाकले आणि सर्वांनी मराठा पुरोहितांकडून पूजा, अर्चना, विधी करून घ्यावेत अशी सूचना सुद्धा केली. परंतु महाराणी लक्ष्मीबाई यांना ही गोष्ट पटलेली नव्हती. म्हणून महाराजाला एक युक्ती सुचली की, आपण आपल्या घरी ब्राम्हणाच्या हातून पूजा करून घ्यायची आणि महाराणीच्या पुरोहिताकडून मत्स्यपुराण वाचावयास सांगितले आणि हे नवरा-बायको मिळून ऐकावयाचे असते, असा महाराणीकडे निरोप पाठवला. महाराणीच्या पुरोहितांनी अनंगदान व्रत वाचावयास सुरुवात करून, त्याचा मराठीत अर्थ सांगू लागला. त्या आख्यानात ब्राम्हणाला पतिव्रता स्त्रीने देह अर्पण केला असता पुण्य लाभते असे लिहिले आहे. हे ऐकताच महाराणी एकदम खडबडून उठल्या आणि म्हणाल्या बंद कर तुझे पुराण, मला हे ऐकायचे नाही आणि उद्यापासून ब्राम्हण पुरोहितांना आपल्या दारात पाऊल सुद्धा टाकू द्यायचे नाही असे म्हटल्या. महाराज म्हणाले आज म्हणाल पण उद्या परत त्यांनाच घरी घेऊन याल. त्यावेळी महाराणी ने मा जगदंबेची शपथ घेतली आणि म्हणाल्या की उद्याच काय तर केव्हाच मी ब्राम्हण पुरोहिता कडून पूजा, विधि करणार नाही आणि त्याला आपल्या दारात सुद्धा उभे करणार नाही. आज जरी ही घटना महत्त्वाची वाटली नसली तरी ती त्या काळी क्रांतिकारी होती.ते एवढ्यावरच थांबले नाही तर, 1917 मध्ये विठ्ठल भाई पटेल यांनी दिल्लीच्या मध्यवर्ती कायदेमंडळात आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता मिळावी म्हणून एक विधेयक आणले. परंतु त्या विधेयकाला सनातन्यांनी विरोध केला. परंतु महाराजांनी त्या विधेयकाला ठोसपणे पाठिंबा दिला आणि त्याचवर्षी आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा आपल्या संस्थांमध्ये पास केला. रोटी बेटी व्यवहार झाल्याशिवाय जातीयता नष्ट होणार नाही असे त्यांना वाटायचे. क्षणभर उपदेशापेक्षा कणभर कृती अधिक महत्त्वाची असते. महाराजांचे वर्तन बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले असे होते. जातीय भेद मोडण्यासाठी हा कृतीशील प्रयत्न त्यांनी केला. वरच्या जातीने, खालच्या जातीतील कुटुंबाशी, वैवाहिक संबंध जोडून जातीयता नष्ट केली पाहिजे असे महाराजांचे मत होते. त्यासाठी स्वतःच्या घरापासून सुरुवात केली. महाराजांच्या कागलकर घाटगे या जनक घराण्यातील, काकासाहेब घाटगे यांची कन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदोरच्या तुकोजीराव होळकर यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी ठरविला, परंतु त्यांच्या अकाली मृत्यूमुळे त्यांच्या हातून हे कार्य घडू शकले नाही, तत्पश्चात त्यांच्या पत्नी महाराणी लक्ष्मीबाई यांनी ते कार्य पूर्ण केले. 1 एप्रिल 1891 मध्ये छत्रपती शाहू महाराज आणि महाराणी लक्ष्मीबाई यांचा विवाह झाला. महाराणी म्हणून त्या कोल्हापुरात आल्या. महाराणी लक्ष्मीबाई आणि शाहू महाराज यांचे वैवाहिक जीवन सुखी व संपन्न होते. त्यांना तीन मुले राधाबाई उर्फ अक्कासाहेब महाराज, राजाराम महाराज आणि प्रिन्स शिवाजी. शाहू महाराजांचे आपल्या पत्नीवर नेतांत प्रेम होते. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील भोगावती नदीवर धरण बांधण्याची योजना 1907 मध्ये सुरू केली होती. त्या तलावाचा समारंभ महाराणी लक्ष्मीबाईच्या शुभ हस्ते करण्यात आला. त्या तलावाला ‘महाराणी लक्ष्मीबाई तलाव’ हे नाव दिले तर धरणाला ‘राधानगरी’ हे मुलीचे नाव दिले. फेजीवडे गावाजवळ, ‘राधानगर’ नावाचे गावही वसविले. महाराजांना महाराणी लक्ष्मीबाईनी प्रत्येक कार्यात साथ दिली. महाराणी लक्ष्मीबाई अत्यंत कनवाळू स्वभावाच्या, महाराजांच्या पत्नी म्हणून त्या त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी जाणून घेत व त्या प्रकारे वागत असत. महाराणी लक्ष्मीबाईने महाराजांच्या पुरोगामी विचारांचा वारसा आयुष्यभर जपला. त्या आपल्या नोकरांच्या कुटुंबांना, नातलगांना त्यांचे हितचिंतक म्हणून औषधाचे साहाय्य करीत असत. सर्वांच्या बरोबर मिळून मिसळून वागण्यात, इतरांना समजून घेण्यात त्या तरबेज होत्या. महाराजांप्रमाणेच अस्पृश्यता निवारण व मागासवर्गीयांना शिक्षण देण्याच्या कार्यात महाराणी लक्ष्मीबाई याही सक्रिय होत्या. मागासलेल्या जातीच्या स्त्रियांच्या शिक्षणाची, कोल्हापुरात सर्व प्रकारची सोय करणारा हुकूम त्यांनी काढला. त्यांनी महाराजांच्या तत्वाशी एकनिष्ठ राहून शिवाजी वैदिक विद्यालयातील पुरोहितांकडून महाराजांचा अंत्यसंस्कार विधी करून घेतला. हे अलौकिक धैर्य दाखवून मोठ्या सुधारकांना सुद्धा तत्वनिष्ठेने धैर्याच्या दृष्टीने मागे टाकले. एका बाजूला हजारो वर्षापासून चालत आलेली रूढी परंपरा त्यांना धमकावित होती तर दुसऱ्या बाजूला छत्रपती शाहू महाराजांची स्मृती त्यांना उत्तेजित करीत होती. अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांचा अंत्यविधी होण्याचा महाराष्ट्रात इतिहासातील पहिलाच प्रसंग होता. छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनामध्ये महाराणी लक्ष्मीबाई यांचा खूप मोठा सिंहाचा वाटा होता आणि त्यांच्या गेल्यानंतर त्यांनी तो वारसा तसाच टिकवून ठेवला. महाराजांच्या विचाराशी एकनिष्ठ राहून, त्यांचे कार्य पुढे नेले. महाराजांनी अनेक दलित, पीडित, शोषित, शिक्षणासाठी, जातीयता नष्ट करण्यासाठी, धरणे, तलाव गाव वसविले, महिलांसाठी अस्पृश्यासाठी शाळा, हॉस्टेल, स्कॉलरशिप यांची सोय करून दिली. त्यांच्या कार्यात महाराणी लक्ष्मीबाईला विसरून चालणार नाही. तर कणखर बनवून त्यांच्या पाठीशी उभ्या राहुल साथ दिली आणि महाराजांचे वयाच्या 48 व्या वर्षी अकाली मृत्यू झाल्याने, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राहिलेले कार्य पूर्ण केले. ■ ■






**ज्योत्सना बनसोड**
8766942982

# मंत्रोच्चाराने सोयाबीनचे पीक वाढण्याचा दावा अशास्त्रीय : अंनिस

## पंजाबराव कृषी विद्यापीठाने भूमिका जाहीर करावी अशी मागणी



**नागपूर :** वसंतराव नाईक प्रतिष्ठान आणि वनराई फाउंडेशनतर्फे देण्यात आलेला प्रयोगशील शेतकरी पुरस्कार स्वीकारताना सेवा सदन संस्थेच्या अध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या कांचन गडकरी यांनी केलेला मंत्रोच्चाराने सोयाबीनचे पीक वाढवण्याचा दावा हा संपूर्णपणे अशास्त्रीय आहे. या कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू, महाराष्ट्रातील हरित क्रांतीसाठी मोठे काम केलेले माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी आपली भूमिका तातडीने जाहीर करावी अशी मागणी महाराष्ट्र अंनिस मार्फत प्रसिद्धी पत्रकाच्या द्वारे करण्यात आली आहे.

याविषयी प्रसिद्धी पत्रकात असे नमूद केले आहे कि, हा पुरस्कार स्वीकारताना कांचन गडकरी यांनी केलेला 'शेतात बियाणे पेरल्यापासून धर्मसंस्कार केले तर शेती भरघोस उत्पादन देते. आम्ही आमच्या धापेवाड्यातल्या शेतीत सोयाबीनला श्री सुक्त व मंत्रोच्चार ऐकवले. त्यामुळे उत्पादन वाढले.' हा दावा पूर्णपणे अशास्त्रीय असून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आहे. मंत्रोच्चारांच्या मध्ये काही विशेष सामर्थ्य असते आणि ते ऐकून सोयाबीनचे झाड स्वतःचे उत्पन्न वाढवू शकते ही गोष्ट शास्त्राच्या प्राथमिक तपसणीवर देखील टिकणारी नाही. सध्या वारी चालू असून ज्ञानेश्वर महाराज यांनी बाराव्या शतकात 'मंत्रेची वैरी मरे। तर का बांधावी कट्यारे?॥' म्हणजेच मंत्राने शत्रू मरत असेल तर कट्यार काय कामाची? असा रोकडा कार्यकारण भाव सांगणारा प्रश्न विचारला आहे. असे असताना एकविसाव्या शतकात मंत्राने सोयाबीनचे उत्पन्न वाढवण्याचे दावे करणे हे उलट्या पावलाचा प्रवास आहे असे देखील या प्रेस नोट मध्ये नमूद केले आहे. सोयाबीनचे शेतकरी गेली अनेक वर्षे शासनाच्या धोरणाच्यामुळे अडचणींत येत असल्याच्या पार्श्वभूमीवर सोयाबीनला शासनाने सांगितलेला हमी भाव न देता अशा स्वरूपाचे दैववादी उपचार सांगणे हे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंच्यासमोर ते केले जात असताना त्यांनी जर त्याचे खंडन केले नाही तर शेतकऱ्यांना ते खरे वाटू शकतात म्हणून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि हा पुरस्कार देणाऱ्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी या विषयी आपली भूमिका जाहीर केली पाहिजे. प्रसिद्धी पत्रकात पुढे नमूद केले आहे कि, जगभरात होणाऱ्या एकूण सोयाबीन उत्पन्नाच्या पैकी 40टक्के ब्राझील, 28 टक्के अमेरिका 12 टक्के आर्जेन्टिना देशांमध्ये होते. भारतामधील सोयाबीन उत्पन्न हे जागतिक सोयाबीन उत्पनाच्या केवळ तीन टक्के आहे. या गोष्टींचा वेळीच विरोध केला नाही तर उद्या कृषी विद्यापीठात या विषयीचे कोर्स चालू झालेले दिसले तर नवल नाही. म्हणून कृषी विद्यापीठ आणि शेतकरी संघटना यांनी देखील या विषयी भूमिका जाहीर करावी अशी अपेक्षा या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून महाराष्ट्र अंनिस मार्फत नंदिनी जाधव, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, डॉ. हमीद दाभोलकर, राजीव देशपांडे, रामभाऊ डोंगरे, प्रकाश घादगिने, सम्राट हटकर, मुक्ता दाभोलकर, अशोक कदम, मुंजाजी कांबळे, फारुख गवंडी, प्रवीण देशमुख, चित्तरंजन चौरे, डॉ. सुनील भगत, इंजी. गौतम पाटील यांनी केली आहे.

# 'संघर्षपर्व सिस्टर रंजना' पुस्तकाचे सेवानिवृत्ती सोहळ्यात प्रकाशन

**नागपूर :** भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष यांना समान अधिकार दिला आहे. म्हणून पुरुषांच्या बरोबरीने महिला सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. अजूनही पाहिजे त्याप्रमाणात महिलांना संधी मिळत नाही. मोजक्या महिलांना शासकीय सेवेची संधी मिळाली आहे. आरोग्य सेवेत नर्सिंग ही सेवा फार मोठी आहे. ही सेवा मातेची, समतेची, करुणेची आहे. सुरुवातीला तर नर्सिंगमध्ये व्यवस्थेसोबत संघर्ष करावा लागत होता. नोकरीत आणि इतर संघर्षात अनेक परिचारिकांनी संघर्षाच केला आहे. त्या संघर्षाचे प्रतिनिधित्व संघर्ष पर्व सिस्टर रंजना हे पुस्तक आहे असे माजी न्यायाधिश धनश्याम रामटेके यांनी प्रतिपादन केले.



परिवर्तन विचार मंच आणि लोखंडे परिवार यांनी शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील वरीष्ठ परिचारिका रंजना लोखंडे यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दि. 1 जुलै रोजी संत रविदास सभागृहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या आदर्श महापुरुषांना पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. भिक्षूनी मेत्यचित्त यांनी बुद्ध विचारांनीच माणसांचे कल्याण होऊ शकते असे सांगितले, तर शालेय जीवनात पहिले पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन चरित्र वाचन केले. त्या वाचनातून मी नर्सिंगकडे आले. या पार्श्वभूमीवर माझ्याकडे बाल विभाग आला. मुलांचे संगोपन करताना आपोआप सामाजिक बांधिलकी जपली असे भावपूर्ण उद्गार रंजना युवराज लोखंडे यांनी सत्कार मनोगतात व्यक्त केले. प्रज्ञामंचावर भिक्षूंनी मेत्यचित्त. माजी न्यायाधीश घनश्याम रामटेके, पद्मा रामटेके, विलास गजभिये, युवराज लोखंडे, हंसराज लोखंडे, लता लोखंडे, भीमराव गाणार, डॉ. हर्षवर्धन कांबळे, प्रा. भीमराव गायकवाड, डॉ. वीणा राऊत, डॉ. माधव जांभुळे, सुलोचना चंद्रकापुरे, मंजुषा जैन, मंगेश नागपुरे, प्रफुल नारनवरे, विकी वाणी, अनिकेत वाणी, राजकुमार नारनवरे, सुधा नागपुरे नारनवरे, सुजाता तेलंग व जयश्री अहिरकर, पुरुषोत्तम अहिरकर, अहिल्याबाई सहारे, सुनंदा गायकवाड, सुनीता रामटेके, डॉ. अशोकानंद देशभ्रतार आदी उपस्थित होते. बामसेफ, परिवर्तन विचार मंच, दैनिक बहुजन सौरभ, आविष्कार कला अकादमी या संस्था परिवारा सोबतचे नाते आणि गरजू लोकांना आर्थिक मदत करण्यात रंजना लोखंडे या सर्वात पुढे असतात असे बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी सांगितले. लोखंडे परिवाराने या प्रसंगी अनेक संबंधित लोकांचा सन्मान केला. विविध मान्यवर यांच्या हस्ते संघर्ष पर्व सिस्टर रंजना पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर परिवर्तन विचार मंच आयोजन समितीच्या वतीने रंजना युवराज लोखंडे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. संचालन, प्रास्ताविक विलास गजभिये, डॉ. विणा राऊत गायक अनिल भगत आणि त्यांचा यांचा गायनाचा कार्यक्रमाने सांगता झाली.

## महत्वाचे



**बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान तर्फे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा गौतमी खोब्रागडे डोंगरे यांनी रिपब्लिकन महिला परिषदेस रुपये 30,000/- चा धनादेश पत्रकार परिषदेनंतर परिषदेच्या तक्षशिला वाघधरे यांच्याकडे दिला.**

## विखुरलेल्या केबल्सने अपघातांना निमंत्रण व शहराची प्रतिमा मलिन



**नागपूर :** एकीकडे आपले शहर विविध समस्यांनी ग्रासले आहे आणि दुसरीकडे प्रशासनही त्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत नाही असे दिसत आहे. अशा अनेक समस्या आहेत ज्या आपल्यासमोर आवासून उभ्या आहेत, मात्र त्या समस्या प्रशासनाद्वारे सोडविल्या जात नाहीत असे चित्र आहे. या समस्यांमध्ये एक समस्या केबलशी (लटकणाऱ्या तार) संबंधित आहे, जी शहरवासीयांसाठी डोकेदुखी बनली आहे. याला किती लोक बळी पडले असतील याचा अंदाजही लावता येणार नाही. या केबल्स विजेच्या खांबांमधून आणि छतांमधून जातात. मोठ्या प्रमाणात गुंडाळलेल्या केबल्स देखील बांधल्या जातात आणि टांगल्या जातात. काही ठिकाणी हे तुटलेले केबल्स रस्त्यांवर पडलेले दिसतात. त्यांच्याकडे पाहून असे वाटते जणू ते अपघाताला आमंत्रण देत आहेत. तुटलेल्या आणि पडलेल्या केबल्समुळे असे अनेक अपघात घडतात ज्यांची नोंदही होत नाही. विखुरलेल्या केबल्समुळे होणार अपघात व शहरातील सौंदर्यात बाधा निर्माण होत आहे. जमाअत-ए-इस्लामी हिंद नागपूरचे मीडिया सेक्रेटरी डॉ. एम.ए. रशीद यांनी शहरातील रहिवाशांच्या सुरक्षेसाठी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. विखुरलेल्या केबल्समुळे होणार अपघात टाळण्यासाठी, शहराचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी परस्पर सहकार्याने या समस्येवर उपाय शोधला जावा, असेही डॉ. एम.ए. रशीद यांनी नमूद केले.

# बाबू हरिदास आवळे यांच्या 110व्या जयंती महोत्सवात ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार



**संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर :** येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर कामठी रोड, नागपूर या ठिकाणी नुकताच कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांचा 110 वा जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा. रणजीत मेश्राम, श्रीमंत माने, डॉ. सिद्धार्थ गायकवाड, डॉ. पुरणचंद्र मेश्राम आणि अध्यक्षस्थानी विनायक जामगडे होते. याप्रसंगी 'कर्मवीर हरिदास आवळे यांची सम्यक दृष्टी व वर्तमान स्थितीत आंबेडकर अनुयायांची भुमिका' या विषयावर परिसंवाद झाला तसेच विनायक जामगडे यांच्या 'प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध एल्गार' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कर्मवीर हरिदास आवळे प्रतिष्ठान नागपूरच्या वतिने रिपब्लिकन पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते विनायकराव जामगडे यांना 'कर्मवीर बाबू हरिदास आवळे जीवन गौरव पुरस्कार' पुरुषोत्तम गायकवाड यांना 'माजी महापौर रामरतन जानोरकर समाज भुषण पुरस्कार,' करुणाकर उके स्मृतिशेष आकांत माटे समाज भुषण पुरस्कार, हरिदास जानोरकर यांना 'स्मृतिशेष सखाराम मेश्राम समाज भुषण पुरस्कार,' अॅड. व्ही. पी. बोरकर यांना स्मृतिशेष गजानन आवळे समाज भुषण पुरस्कार', प्रा. डॉ. सविता कांबळे यांना 'स्मृतिशेष ताराबाई मेश्राम समाज भुषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला तसेच यशवंत गजघाटे, यादवराव पाटील, नानाजी गायकवाड, विनोद आटे, प्रभाकर पानतावने, नामदेव खोब्रागडे, मधुकर बोरीकर, श्रीराम गणेर, रामभाऊ आंबुलकर, भाऊराव वानखेडे, आनंद तेलंग आणि सचिन कांबळे इ. मान्यवरांना सन्मानपत्र देवून तंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. भोला सरवर, सूर्यकांत मुनघाटे, डॉ. एम.एस. वानखेडे, भीमराव फुसे, राजकुमार मेश्राम, प्रविण कांबळे, नरेश पाटील, राम घोडेस्वार, संजय उपरे इ.सह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

# बीआरएसपीचे विदर्भ स्तरीय प्रशिक्षण शिबीर 5, 6 जुलै ला नागपूरात




**नागपूर :** आरक्षणाचे जनक लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी द्वारा राज्यभर विभागीय स्तरावर कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. नुकतेच पश्चिम महाराष्ट्र विभागीय प्रशिक्षण शिबीर 25, 26, 27 जून रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आले. दुसरे प्रशिक्षण शिबीर विदर्भ विभागीय स्तरावर 5, 6 जुलै रोजी नागपूर जिल्ह्यातील चिचोली फेटरी येथे घेण्यात येत आहे. दोन दिवसीय या प्रशिक्षण शिबीरात बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, संविधान तज्ञ डॉ. सुरेश माने संबोधित करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेऊन कार्यकर्त्यांना राज्यातील चालू घडामोडींचा चळवळीवर होणारा परिणाम, फुले, शाहु, आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी कार्यकर्त्यांची जबाबदारी, बहुजन समाजातील युवकांना शिक्षण, बेरोजगारीचा भेडसावणाऱ्या समस्या इत्यादी विषयांवर मार्गदर्शन डॉ. सुरेश माने मार्गदर्शन करणार आहेत. 6 जुलै रोजी पत्रकार परिषदेत आगामी निवडणुकीत पक्षाची भूमिका काय असेल यावर निर्णय जाहीर करण्यात येईल अशी माहिती बी आरएसपीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी सांगितले.




## महाप्रजाप्रती गौतमी बुद्ध विहार

महाप्रजापती गौतमी भिक्खुणी संघ द्वारा संचालित महाप्रजापती गौतमी बुद्ध विहार नागार्जुन कालोनी, नारा रोड नागपूरची स्थापना 1991 साली करण्यात आली. अथक प्रयत्नाची पावती म्हणून प्रशस्त महाविहार सभागृह वाचनालय भिक्खुणी निवास असुन दररोज सकाळी, रात्री वंदना, धम्मदेसना विविध धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात येतात. विशाखा थेरी व शिलाचारा, कात्यायनी यांच्या श्रमसाफल्यातून साकारलेला हे संस्थागार आहे.

संवाद मित्र,भदंत नागदिपंकर महास्थविर
मो. 9423605550

# अनाथांचे पितृत्व छत्र काशीनाथ मेश्राम यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त बौद्ध धम्म प्रचारक डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन आणि डॉ. भदन्त सावंगी मेधंकर यांच्या समग्र नागपूर येथील निवासा दरम्यानच्या प्राथमिक सेवा साहित्य संपदा प्रूफ रीडिंग प्रकाशन वितरण सह अन्य जबाबदाऱ्या पार पाडत उच्च शिक्षण घेणाऱ्या काशिनाथ मेश्राम यांनी बौद्ध प्रशिक्षण संस्थान बुद्धभुमी महाविहार बुद्धभुमी प्रकाशन भदन्त आनंद कौसल्यायन बुक डेपो डॉ. सावंगी मेधंकर स्मृती प्रतिष्ठान प्रेरणाभूमीच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. या संघर्षाची पावती म्हणजे आजचा अमृत महोत्सव होय. या पुढे सुद्धा राहुल बाल सदनचे संस्थापक द्वय 'डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन आणि डॉ. भदन्त सावंगी मेधंकर व मातृत्व पितृत्वरुपी विमल आडे माई व काशिनाथ मेश्राम यांचा आदर्श ठेवा अधिक जोमाने सांघिकपणे पुढे नेण्याचा प्रयत्न करत श्रमसाफल्य यशस्वी होईल यासाठी प्रयत्न करीत रहा,' असा संदेश परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे विश्वस्त भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी दिला. राहुल बाल सदन महेंद्र नगर बिनाखी ले आऊट नागपूर येथे बाल सदनच्या आजी माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी व त्यांच्या परिवाराच्या वतीने काशिनाथ मेश्राम यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी बौद्ध प्रशिक्षण संस्थानचे भदंत प्रज्ञाज्योती महास्थविर भदन्त अश्वघोष महास्थविर भीक्खु यश व राहुल बाल सदनच्या व्यवस्थापक विमल आडे आणि अनेक दायक-दायिका उपस्थित होते.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बबन कांबळे, राजु कांबळे, अनिल बनकर, सुनिल बनकर, आकाश ढोके, चंद्रशेखर भोयर, रवि मेश्राम, गौतम भोवते, पंकज कोल्हे, बादल पानतावने, शिल्पा सामरतलवार, भीमराव निकोसे, दिपक वानखेडे, राहुल वानखेडे, प्रविण राऊत, सुधिर नादेकर, अनिता कांबळे, हर्षदा कांबळे, सुप्रिया बनकर, ऊषा बनकर, हेमा ढोके, गुणुप्रिया भोयर, हर्षनी मेश्राम, रोषनी कोल्हे, दिपा पानतावने, वैशाली निकोसे, प्रणाली वानखेडे, कोमल वानखेडे, वर्षा राऊत, संजु नादेकर, चित्रा रामटेके, शंकरराव बरडे, माया बरडे, अक्षता चव्हाण, अमित चव्हाण, अनिता मेश्राम, मंजुश्री, मयंक, विदिशा, नोरीका, आचल, आशु, गाथा, सिमरन, श्रद्धा, प्रणय, कुलबुल, निमिशा आणि इतरांनी प्रयत्न केले.

## निधन वार्ता

### पार्वती हरीशचंद्र मेश्राम



**नागपूर :** गोपालनगर येथील हरि अपार्टमेंन्ट रहिवासी सतीश मेश्राम यांच्या आई पार्वती हरीशचंद्र मेश्राम यांचे निधन वयाच्या 80व्या वर्षि बुधवार दि. 2 जुलै रोजी झाले असून त्यांच्यावर दि.3 जुलै रोजी सकाळी 9.30 वाजता निघून अंबाझरी घाटावर अंत्यविधी करण्यात आला.

# दाभा प्रदर्शन केंद्र घोटाळ्याचा ठाकरे यांनी विधानसभेत केला पर्दाफाश

## MSIDCच्या सर्व प्रकल्पांची चौकशी करण्याची मागणी



**नागपूर :** पश्चिम नागपूरचे आमदार आणि नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी मुंबईत सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाभा प्रदर्शन केंद्र घोटाळ्याचा महाराष्ट्र विधानसभेत पर्दाफाश केला. त्यांनी महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MSIDC) द्वारा राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

हे महामंडळ सध्या रेल्वे विभागातून सेवानिवृत्त झालेल्या ब्रिजेश दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून, दीक्षित यांनी मेट्रोच्या कार्यकाळात प्रचंड भ्रष्टाचार आणि नियमांचे उल्लंघन केल्याचे आधीच सिद्ध झाले आहे.

ठाकरे यांनी विधानसभेत सांगितले की, दीक्षित रेल्वेमधून आले असून त्यांनी महामेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालकपदाच्या कार्यकाळात अनेक बेकायदेशीर कृत्ये केली आणि तीच पद्धत आता स्स्द्धष्ष्टमध्येही सुरू आहे. दाभा येथे दिक्षीत यांनी खासगी कंपनी ह्ष्ष्ट लिमिटेडला काम देण्यासाठी टेंडर काढले, वर्क ऑर्डर दिली आणि कोणतीही अनिवार्य परवानगी न घेता बांधकाम सुरू केले. त्यामध्ये आरक्षण वगळणे, फायर एनओसी आणि इमारत मंजुरीचा समावेश होता. ही जमीन - खसरा क्र. 175, मौजा दाभा - महसूल विभागाच्या नोंदीमध्ये झुडपी जंगल म्हणून आरक्षित आहे आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (क्ष्छयङ्क)च्या कृषी वानिकी शिक्षण व संशोधनासाठी राखीव आहे. ही जमीन फुटाळा तलावाच्या जलग्रहण क्षेत्राचा देखील भाग आहे. ठाकरे यांनी नमूद केले की सर्व आवश्यक मंजुरी घेतल्याशिवाय टेंडर काढणे नियमबाह्य आहे, तरीही दीक्षित यांनी राज्य सरकारच्या निधीचा गैरवापर करून कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. हे बांधकाम द्रुस्त्रच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच सुरू आहे, जिथे 100 मीटर परिसरात कोणतेही बांधकाम निषिद्ध आहे.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार झुडपी जंगल म्हणून ही जमीन वनविभागाने ताब्यात घ्यावी, अशीही त्यांनी मागणी केली. हेही लक्षात घेण्यासारखे आहे की कॉम्प्ट्रोलर अँण्ड ऑडिटर जनरल (ष्ट्ठ) ने यापूर्वी दीक्षित यांच्या कार्यकाळात नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पात रू. 1,000 कोटींपेक्षा अधिकचा घोटाळ उघड केला होता. त्या प्रकल्पातील बहुतांश कंत्राटे ह्ष्ष्ट लिमिटेडला टेंडरशिवाय दिली गेली होती. सध्या स्स्द्धष्ष्टमध्येही हेच मॉडेल पुन्हा राबवले जात असल्याचे स्पष्ट दिसून येते. ठाकरे यांनी हे सर्व प्रकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याही निदर्शनास आणून दिले असून, स्स्द्धष्ष्ट आणि ह्ष्ष्ट लिमिटेडच्या बेकायदेशीर कामकाजाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

चलो संविधान चौक, नागपूर. 1 जुलै 2025 दोपहर 3.00 बजे से महाबोधी महाविहार मुक्त व्हावे व दिक्षाभुमी सौंदर्यकरण विनाविलंब सुरु करावे या मागणीसाठी तसेच बिहार व महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन सुरु आहे आज आंदोलनाचा 3 रा दिवस, सकाळी 10.00ते 6 वाजेपर्यंत आंदोलक मोठ्या उत्साहाने उपस्थीत, नागपूर कर जनतेला आव्हान, दि. 4.7.25पासुन जास्तीत जास्त सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने केले आहे,




# 6 जुलैला क्रांतीपर्व या काव्यसंग्रहाचे लोकार्पण व कविसंमेलन




**हिंगणा :** महाराष्ट्रातील नामवंत कवी सुभाष मानवटकर (निळं पाखरु) यांच्या पहिल्याच 'क्रांतीपर्व' या काव्य संग्रहाचा लोकार्पण सोहळा मानवटकर भवन, वानाडोंगरी येथे रविवार दि. 6 जुलै रोजी संपन्न होणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन प्रा. डॉ. ईश्वर नंदापुरे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी प्रा. राहूल तागडे राहतील. राज्यस्तरीय काव्य संमेलन दोन सत्रात घेण्यात येत असून पहिल्या सत्राचे संमेलनाध्यक्ष प्रा. मनोहर नाईक राहतील तर दुसऱ्या सत्रातील काव्यसंमेलनाचे अध्यक्षपद प्रा. प्रभाकर तांडेकर भूषविणार आहेत. या प्रसंगी प्रा. जावेद पाशा कुरेशी, वैशाली मुन, सेवानिवृत्त विभागीय शिक्षण उपसंचालक निलेश पाटील, अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे, आंबेडकरी विचारवंत विनायक जामगडे, राष्ट्रीय प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे, उद्योजक विनोद जाधव, हरीचंद्र धिवार, नरेंद्र पवार मुंबई, वैशाली खंदारे, नागनाथ डोलारे, पनवेल, बबन मोरे हिंगोली, सुनिता तागवान गडचिरोली, माला मेश्राम नवी मुंबई, अविनाश टिपले चंद्रपूर व प्रा रविंद्र गिमोनकर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला महाराष्ट्रभरातील नामवंत कवीचा सहभाग असून या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्य आयोजक कवी सुभाष मानवटकर (निळं पाखरु), सतिश सोमकुवर, संदिप शेंडे, दिलीप मुन, भावेश कोटांगले, सुभाष कोठारे, मनोज कोटांगले, निखिल मानवटकर, स्वप्निल मानवटकर, विनोद सोनारे, शालीनी सुभाष मानवटकर प्रयत्नशील असून त्यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे कवींना आवाहन केले आहे. या संमेलनाच्या यशस्वीतेकरीता अखिल भारतीय संत गाडगेबाबा कला साहित्यिक विचार मंच व अक्षरक्रांती फाऊंडेशन नागपूर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.






बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648